१.

# तत्त्वज्ञान

# (Philosophy)

मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. विचार करणे हा मनुष्याचा एक विशिष्ट गुण आहे. त्यामुळेच तो इतर प्राणीमात्रांपेक्षा वेगळा समजला जातो. एवढेच नाही तर चांगले-वाईट असा भेद करण्याचा विवेक त्याच्याजवळ असल्याने तो विवेकशील प्राणी देखील आहे. विवेकाचा संबंध बुद्धीशी असल्याने मनुष्य आपल्या बुद्धीच्या साहाय्याने विश्वातील विविध वस्तूंचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करत असतो. विश्वाच्या स्वरूपाच्या अनुषंगाने अनेक प्रश्न त्याच्यासमोर निर्माण होतात. विश्वाचे नेमके स्वरूप काय आहे? त्याची निर्मिती का व कशी झाली ? विश्वनिर्मितीचे काही प्रयोजन आहे का ? आत्मा म्हणजे काय ? जीव म्हणजे काय ? ईश्वराचे अस्तित्व आहे का ? जीवनाचे अंतिम ध्येय कोणते ? ज्ञान म्हणजे काय ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मनुष्य आपल्या बुद्धीने सोडवण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रश्नांना काटेकोर युक्तीवादांच्या आधारे उत्तरे देण्याचा प्रयत्न म्हणजेच तत्त्वज्ञान होय.

तत्त्वज्ञानास इंग्रजीत Philosophy असे म्हणतात. Philosophy हा शब्द Philos म्हणजे प्रेम आणि Sophia म्हणजे ज्ञान किंवा शहाणपणा अशा दोन शब्दांपासून तयार झाला आहे. म्हणून ज्ञान किंवा शहाणपणा विषयी प्रेम म्हणजे तत्त्वज्ञान (Philosophy) होय.

आपल्याकडे तत्त्वज्ञानास 'दर्शन' असेही म्हणतात. दर्शन हा शब्द 'दृश्' धातूपासून बनला असून त्याचा अर्थ पाहण्याचे साधन (ज्याच्याद्वारे पाहिले जाते) असा होतो. म्हणून भारतीय संदर्भात सांगायचे झाल्यास 'ज्या द्वारे तत्त्वाचे ज्ञान होते ते दर्शन होय. सरळ सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास 'तत्त्वाविषयीचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान' होय.

तत्त्वज्ञानाच्या व्याख्या :

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात वैचारिक एकमत होऊ शकत नाही. त्यामुळे खुद्द तत्त्वज्ञान या शब्दाची काटेकोर एकसंध व्याख्याही होऊ शकली नाही. तरीपण विविध तत्त्वज्ञांनी जे विविध अर्थ सांगितले त्यावरून काही स्थूल व्याख्या सांगता येतात.

**१. तत्त्वज्ञान म्हणजे मानवाच्या अखिल अनुभवांची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न होय :**

आपल्या अनुभवास येणारे जे विश्व आहे, त्याचा आधार काय ? त्याचे अधिष्ठान कोणते ? हा तत्त्वज्ञानाचा मुलभूत प्रश्न आहे. आपण जीवन जगत असताना आपल्याला जे असंख्य अनुभव येत असतात, त्यांचा एक दुसऱ्याशी काही संबंध आहे काय ? हे संबंध आंतरिक आहेत की बाह्य स्वरूपी आहेत ? विश्वाच्या बुडाशी असणारे अंतिम तत्त्व अनुभवसापेक्ष आहे किंवा नाही ? ते एक आहे की अनेक आहेत ? जडस्वरूपी आहे की चैतन्यस्वरूपी आहे ? आपले अनुभव कारण-कार्य तत्त्वाने बद्ध आहेत की नाहीत ? असे कितीतरी प्रश्न तत्त्वज्ञानात विचारले जातात. त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. मानवी अनुभवविश्व अनेक विशिष्ट क्षेत्रांनी मिळून बनलेले असते. त्या प्रत्येक विशिष्ट क्षेत्राची व्यवस्था लावण्याचे कार्य विविध शास्त्रे करत असतात. परंतु मानवाच्या संपूर्ण अनुभवविश्वाची व्यवस्था लावण्याचे कार्य तत्त्वज्ञान करते.



**२. तत्त्वज्ञान म्हणजे अंतिम प्रश्न सोडवण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न होय :**

अंतिम प्रश्न म्हणजे असा प्रश्न की ज्याचे उत्तर मिळाल्यावर नंतर कुठलाच प्रश्न निर्माण होणार नाही. तत्त्वज्ञान असे अंतिम प्रश्न सोडवण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करते. विज्ञानात उपस्थित केले जाणारे प्रश्न अंतिम नसतात. विज्ञानात अनेक प्रश्न विचारले जातात व त्यांची उत्तरेही मिळवली जातात. परंतु विज्ञान एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जाऊन थांबते. तिथून तत्त्वज्ञानाची सुरूवात होते. म्हणूनच असे म्हटले जाते की, जिथे विज्ञान संपते तिथे तत्त्वज्ञान सुरू होते. विज्ञान अमुक एखादी गोष्ट म्हणजे 'काय आहे ?' (What it is?) असा विचार करते तर तत्त्वज्ञानात अमुक एखादी गोष्ट 'कशामुळे आहे ?' (How it is?) असा विचार केला जातो. उदा.पाणी म्हणजे काय आहे ? असा विचार विज्ञान करते. उद्जनवायू (Hydrogen) चे दोन अणू व प्राणवायू (Oxygen) चा एक अणू यांचे संयुग म्हणजे पाणी असे उत्तरही देते. परंतु पाण्याचे अस्तित्व कशामुळे आहे ? याचा विचार ते करत नाही. तो प्रश्न तत्त्वज्ञानाचा आहे. काल म्हणजे काय ? ज्ञान म्हणजे काय ? अस्तित्व म्हणजे काय? सत्य म्हणजे काय ? अवकाश म्हणजे काय ? अशा अंतिम स्वरूपी प्रश्नांचा सुसंगतपणे विचार करण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान करते.

**३. अंतिम सत्याचा वेध घेण्याचा प्रयत्न म्हणजे तत्त्वज्ञान :**

परिवर्तन हा सृष्टीचा स्थायीभाव आहे. प्रत्येक क्षणास सृष्टीत परिवर्तन घडून येत असते. त्यामुळे या परिवर्तनशील सृष्टीशी निगडीत असणारी सत्ये देखील परिवर्तनीय असणे स्वाभाविक आहे. विज्ञानात कोणतेही सत्य अंतिम म्हणून स्वीकारले जात नाही. परंतु तत्त्वज्ञानात मात्र अशा अंतिम तत्त्वांचा/सत्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जातो. बहुतेक सर्वच तत्त्वज्ञानात्मक विचार प्रवाहांनी अशी अंतिम सत्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. काहींच्या मते अंतिम तत्त्व हे जड स्वरूपी किंवा भौतिक आहे. तर काहींच्या मते या सृष्टीचे आदिकारण ईश्वर हेच अंतिम सत्य आहे. याउलट फलवादासारखी विचारसरणी अंतिम सत्य निश्चित स्वरूपाचे

असू शकत नाही. तो परिवर्तनीय असते अशी भूमिका घेत असली तरी अंतिम सत्याचा विचार करतोच. याशिवाय अंतिम सत्य एकस्वरूपी आहे की अनेक स्वरूपी आहे, असाही विचार तत्त्वज्ञानात केला जातो. काहींच्या मते अंतिम तत्त्व एकच आहे, तर काहींजण अंतिम तत्त्वे दोन किंवा अधिक मानतात.

४. जटील संकल्पनांचे सरल संकल्पनांत विश्लेषण करणे म्हणजे तत्त्वज्ञान होय :

अलीकडील काळात इतर कोणत्याही प्रश्नांपेक्षा 'जटील संकल्पनांचे सरल संकल्पनांत विश्लेषण करणे' हे तत्त्वज्ञानाचे प्रमुख कार्य आहे असे मानले जात आहे. आपण व्यवहारात अनेक प्रकारच्या संकल्पना वापरतो. त्या संकल्पनांचे अनेक अर्थ असतात. त्यामुळे त्या संकल्पनेचा व्यवस्थित अर्थबोध होत नाही. आणि म्हणून आपल्या ठिकाणी वैचारिक गोंधळ निर्माण होऊ शकतो. व्यवहारात अनेक गोष्टींचा केवळ व्यवस्थित अर्थ न समजल्यामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आपण पाहतो. अशा वेळी ज्या मुलभूत स्वरूपाच्या संकल्पना आहेत, अशा संकल्पनांच्या अर्थाचे पदर उकलून दाखवणे, त्यांचे सरल संकल्पनांत विश्लेषण करून वैचारिक गोंधळ मिटवला पाहिजे. तेच तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. असा विचार रूढ झाला आहे. जडद्रव्य, चैतन्य, सौंदर्य, सत्यत्व, आत्मा, कारणता, ईश्वर यासारख्या संकल्पना मुलभूत आहेत. कारण इतर संकल्पनांना त्या आधारभूत असतात. अशा संकल्पनांचे व्यवस्थित विश्लेषण करणे हे तत्त्वज्ञानाचेच कार्य आहे.

तत्त्वज्ञानाच्या इतरही काही व्याख्या सांगता येतील परंतु त्या फारशा वेगळ्या नाहीत किंवा वर प्रतिपादन केलेल्या व्याख्यांपेक्षा फारसा वेगळा अर्थ सांगत नाहीत.

## तत्त्वज्ञानाचे मानवी जीवनातील महत्त्व :

साधारणपणे असे मानले जाते की, तत्त्वज्ञान हा निव्वळ काथ्याकूट आहे. सर्वसामान्याच्या दृष्टीने तत्त्वज्ञान निरूपयोगी आहे. कारण तत्त्वज्ञानाने माणसाच्या



पोटाचा प्रश्न सुटत नाही. मग तत्त्वज्ञान शिकायचे कशाला ? त्याविना आपले काही अडले आहे काय ? असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. याला असे उत्तर देता येते की निव्वळ व्यावहारिक पातळीवर तत्त्वज्ञानाचा उपयोग होताना दिसत नसला तरी मानवी जीवनात तत्त्वज्ञानाचे अनन्यसाधारण महत्व आहे. ते पुढील मुद्दांच्या सहाय्याने स्पष्ट करता येते.

१. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी शारीरिक किंवा भौतिक आणि आत्मिक किंवा आंतरिक अशा दोन प्रकारच्या गरजा असतात. प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर असणाऱ्या विज्ञानाने व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या भौतिक गरजांची पूर्तता केली आहे, करत आहे. सर्व प्रकारची सुखे आज हात जोडून उभी आहेत. तरीपण माणूस आंतरिक दृष्ट्या मात्र असमाधानी, दुःखी आहे. त्याला भौतिक गरजांच्या पुढे जाऊन एका अशा सुखाची अपेक्षा असते की, जे सुख कधीही न संपणारे असते. ते सुख म्हणजे मानसिक किंवा आत्मिक सुख होय. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने व्यक्तीची आत्मिक गरज भागते, व्यक्ती मानसिकदृष्ट्या समर्थ, समाधानी बनू शकते.

२. तत्त्वज्ञानातील प्रश्न अंतिम स्वरूपाचे असतात हे आपण पाहिले. या प्रश्नांची उकल करण्यासाठी केले जाणारे युक्तीवाद अतिशय सूक्ष्म, काटेकोर व सुसंगत स्वरूपाचे असतात. कोणत्याही प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचा तो प्रयत्न असतो. अशा युक्तीवादांचा अभ्यास केल्याने आपली विचारांची प्रवृत्तीही तशीच बनते. आपणही सूक्ष्म, काटेकोर आणि सुसंगत विचार करायला शिकतो.

३. सर्वसामान्य माणूस कुठल्यातरी एका संकुचित दृष्टीने जीवनाकडे पहात असतो. एक तर तो आशावादी, निराशावादी किंवा तटस्थपणे जीवन जगत असतो. दुसरे असे की कणभर सुख मिळाले की तो लगेच हुरळून जातो व थोडेही दुःख निर्माण झाले की तो उध्वस्तही होत असतो. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळे आपली जीवनाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक व उदार बनते. व्यक्ती सुख आणि दुःखाला सारख्याच दृष्टिने पहायला शिकते.

४. जीवन जगत असताना बहुतांशी व्यक्तींचे जीवन विषयक ध्येय इतरांच्या किंवा इतर गोष्टींच्या अनुषंगाने ठरत असते. कारण ते ठरवण्याची दृष्टी त्याच्याजवळ नसते. परंतु स्वतःचे जीवन विषयक ध्येय स्वतः ठरवले तर ते कधीही इष्ट ठरते, तशी डोळस दृष्टी आपल्याला तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातूनच मिळते.

५. तत्त्वज्ञान म्हणजे जीवनाकडे पाहण्याचा डोळस दृष्टिकोन होय. कोणत्याही समाजाचा जीवनाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन असतो. एक विशिष्ट संस्कृती असते. म्हणून कोणत्याही समाजाचा जीवन विषयक दृष्टिकोन, संस्कृती समजून घ्यावयाची असेल तर सर्वप्रथम त्या समाजात प्रचलीत असलेल्या तत्त्वज्ञानाचाच अभ्यास करावा लागतो.

## तत्त्वज्ञानाच्या प्रमुख शाखा :

( तत्त्वज्ञान हा एक अत्यंत व्यापक असा विषय आहे. कारण मानवी जीवनातील प्रत्येक अनुभव तसेच विश्वातील सर्व प्रकारची तथ्ये, घटनांचा विचार व चिंतन करण्याचे कार्य तत्त्वज्ञान करते. तत्त्वज्ञानाची ही व्यापकता व्यवस्थित आणि सहजसुलभ पद्धतीने समजून घेता यावी यासाठी तत्त्वज्ञानाच्या तीन प्रमुख शाखा मानल्या जातात.

### १. ज्ञानशास्त्र (Epistemology) :

तत्त्वज्ञानाची ही सर्वात महत्त्वाची शाखा मानली जाते. यात प्रामुख्याने ज्ञानाविषयी प्रश्न उपस्थित केले जातात. मानवी मनात ज्ञानाची निर्मिती कशी होते किंवा कोणत्याही विषयाचे ज्ञान आपल्या मनात कसे प्रवेश करते ? हा ज्ञानशास्त्राचा प्रमुख प्रश्न आहे. The dictionary of Philosophy नुसार 'ज्ञानशास्त्र ही तत्त्वज्ञानाची अशी शाखा आहे की, जी ज्ञानाची उत्पत्ती, स्वरूप, पद्धती तसेच त्याचे प्रामाण्य याचा शोध घेते.' या व्याख्येनुसार ज्ञानाची उत्पत्ती कशी होते ? ज्ञानाचा विकास कसा होतो ? ज्ञानाची प्रक्रिया नेमकी कशी असते ? ज्ञानाचे स्वरूप कसे आहे ? ज्ञानाची साधने कोणती ? ज्ञानाचे प्रकार कोणते ? ज्ञेय म्हणजे काय ? ज्ञाता म्हणजे कोण ? ज्ञेय आणि ज्ञाता यांचा संबंध कोणता ? ज्ञान यथार्थ की अयथार्थ हे ठरवायचे कसे ? अशा स्वरूपाच्या प्रश्नांचा या शाखेत विचार केला जातो. अर्थात वर उपस्थित केलेले सर्व प्रश्न विवादास्पद आहेत. कारण त्यांची उत्तरे विविध प्रकारे दिली गेली आहेत. असे असले तरी सर्व विचारप्रवाह ज्ञानशास्त्रास तत्त्वज्ञानाची महत्त्वपूर्ण शाखा मानतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणतेही तत्त्वज्ञान ज्ञानविषयक कोणती भूमिका स्वीकारते त्यावरच त्याचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठरत असतो.

### २. नीतिशास्त्र (Ethics) :

ही तत्त्वज्ञानाची दुसरी महत्त्वाची शाखा आहे. ज्यास आचरणाचे शास्त्र असेही म्हणतात. प्रत्येक विवेकशील व्यक्ती नैतिकतेवर विश्वास ठेवतो. शुभ-अशुभ, योग्य-अयोग्य, उचित-अनुचित, चांगले-वाईट, पाप-पुण्य यावर प्रत्येक विवेकशील व्यक्तीचा विश्वास असतो. अशा गोष्टींनाच नैतिकता म्हटले जाते. ज्याचे प्रारंभिक ज्ञान व्यक्तीस सामाजिक रुढी, सामाजिक नियमांच्या माध्यमातून होत असते. सुरूवातीस व्यक्ती अशा गोष्टींना कोणत्याही तर्काशिवाय किंवा बौद्धिक चिकित्सेशिवाय स्वीकारतो. परंतु नीतिशास्त्रात अशा गोष्टींचे बौद्धिक मूल्यमापन केले जाते. या शाखेत प्रामुख्याने व्यक्तीच्या आचरणाचा आदर्शात्मक अभ्यास केला जातो. 'आचरण म्हणजे काय ? किंवा आचरण कसे घडते ?' हा प्रश्न मानसशास्त्राचा आहे. तर 'आचरण कसे असावे ?' हा प्रश्न नीतिशास्त्राचा आहे. चांगले किंवा वाईट आचरण कोणते ? मानवी आचरणाचे अंतिम ध्येय कोणते असावे ? ते ध्येय साध्य करण्याचा मार्ग कोणता ? अशा प्रश्नांचा विचार नीतिशास्त्रात केला जातो. नीतिशास्त्रात मानवी आचरण किंवा चारित्र्याचे मूल्यमापन केले जात असल्याने त्यास मूल्यशास्त्र किंवा मूल्यमीमांसा असेही म्हणतात. या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की नीतिशास्त्र व्यक्तीस नैतिक बनवत नाही तर केवळ नैतिकतेचा मार्ग दाखवते.

### ३. सत्ताशास्त्र (Metaphysis) :

ही तत्त्वज्ञानाची तिसरी महत्त्वाची शाखा आहे. Metaphysics याचा अर्थ 'जे विज्ञानाच्या पलीकडील आहे ते.' सत्ताशास्त्रात दृश्य जगाच्या अतीत असणाऱ्या तत्त्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. विज्ञान दृश्य जग किंवा भौतिक जगाची व्याख्या करण्याचा प्रयत्न करते. तर सत्ताशास्त्र अशा तत्त्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न करते की जी तत्त्वे या दृश्य जगाच्या अतीत आहेत व जी तत्त्वे या जगाची आधारभूत तत्त्वे आहेत. म्हणूनच असे म्हटले जाते की जिथे विज्ञान संपते, तिथे तत्त्वज्ञानाची सुरूवात होते. 'विश्वाच्या बुडाशी असणारे अंतिम तत्त्व कोणते ?' हा तत्त्वज्ञानातील प्रमुख प्रश्न आहे असे अगदी प्राचीन काळापासून मानले जाते. आज तोच सत्ताशास्त्राचा प्रश्न आहे. अंतिम तत्त्व एक आहे की, अनेक आहेत ? अंतिम तत्त्व जडस्वरूपी आहे की चैतन्यमय आहे ? हे दोन दुसरे महत्त्वाचे प्रश्न होत. या प्रश्नांनाही विविध उत्तरे दिली गेली. अंतिम तत्त्व एकच आहे असे मानणारे एकतत्त्ववादी तर अंतिम तत्त्वे अनेक आहेत असे मानणारे बहुतत्त्ववादी होत. अंतिम तत्त्व जड मानणारी जडवादी किंवा भौतिकवादी तर अंतिम तत्त्व चैतन्य मानणारी आत्मवादी समजले जातात.

वर प्रतिपादन केलेल्या तीन शाखा तत्त्वज्ञानाच्या प्रमुख शाखा मानल्या जातात. याशिवाय तर्कशास्त्र (Logic), सौंदर्यशास्त्र (Aesthestics), शैक्षणिक तत्त्वज्ञान (Philosophy of education), सामाजिक तत्त्वज्ञान (Social Philosophy), राजकीय तत्त्वज्ञान (Political philosophy) अशा अनेक शाखा अलीकडील काळात निर्माण झाल्या.

### तत्त्वज्ञान आणि विज्ञान (Philosophy and Science) :

तत्त्वज्ञान या संकल्पनेचा सविस्तर अर्थ आपण सुरूवातीलाच पाहिला. त्यानुसार तत्त्वज्ञान हे सत्याचे शास्त्र आहे. परंतु तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांचा



नेमका संबंध कोणता ? या प्रश्नाचे उत्तर पाहण्यापूर्वी 'विज्ञान' संकल्पनेचा संक्षिप्त परिचय करून घेणे आवश्यक ठरते.

१) विज्ञान मानवी ज्ञानाची एक विशिष्ट शाखा असून विज्ञानाचे काही विशिष्ट प्रकार आहेत. उदा. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इत्यादी. यापैकी कोणतेही विज्ञान विश्वाच्या एका विशिष्ट भागाचे अध्ययन करते. २) विज्ञान हे पदार्थ, निश्चित, सामान्य किंवा व्यापक नियमांचा शोध लावून त्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करते. ३) विज्ञान आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी निरीक्षण व प्रयोग या दोन प्रक्रियांचा आधार घेते. ४) विज्ञानाची काही गृहीत तत्त्वे असतात, त्यांना अनिवार्य मानले जाते. उदा. कारणकार्य तत्त्व, निसर्गसमरूपता तत्त्व.

काही विचारवंताच्या मते विज्ञान व तत्त्वज्ञान परस्परभिन्न आहेत कारण दोहोंमध्ये पुढीलप्रमाणे भेद दाखवता येतात.

१) विज्ञानाचा दृष्टिकोन आंशिक (Partial) असतो तर तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोन सार्वभौम (Universal) असतो. २) विज्ञानाच्या दृष्टिने जड किंवा भौतिक पदार्थ हीच मूळ किंवा अंतिम सत्ता आहे. परंतु यापुढे जाऊन तत्त्वज्ञान मात्र आध्यात्मिक तत्त्वांच्या शोधाला प्राधान्य देते. ३) विज्ञानाची संपूर्ण भिस्त प्रयोगावर असते तर याउलट तत्त्वज्ञानात प्रयोग शक्य नसतात. ४) विज्ञानाच्या दृष्टिने कारणकार्याचे तत्त्व ही कोणत्याही संशोधनाची प्राथमिक अट आहे. परंतु तत्त्वज्ञान हे प्रामुख्याने आध्यात्मिक किंवा अभौतिकाशी निगडीत असल्याने कारणकार्याचा नियमांचा उपयोग शक्य नसतो.

वरील मुद्याच्या आधारे तत्त्वज्ञान व विज्ञान यांत काहीही संबंध नसून ते परस्परविरोधी आहेत असा समज होण्याची शक्यता आहे. असे असले तरी त्या दोहोंत एक अतूट असा संबंधही आहे. ते परस्परपूरकही आहेत हे खालील मुद्यांवरून लक्षात येते.

१) विज्ञान मानवी व्यवहार शुद्ध आणि व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करते तर तत्त्वज्ञान हे विज्ञानास शुद्ध आणि व्यवस्थित करण्यास सहाय्यक ठरते. २) विज्ञानाची काही स्वयंसिद्ध गृहितकें असतात. उदा. कारणकार्य तत्त्व, निसर्गसमरूपता तत्त्व, काल, अवकाश इ. विज्ञान त्यांची तार्किक व्याख्या करू शकत नाही किंवा त्यांची तपासणीही करत नाही. परंतु तत्त्वज्ञान मात्र त्यांची बुद्धिच्या निकषावर तपासणी, समीक्षा करून त्या तत्त्वांना एक तार्किक अधिष्ठान मिळवून देते. ३) विज्ञानाचा दृष्टिकोन आंशिक असतो. ती आंशिकता दूर करून त्याला संपूर्णता प्रदान करण्यास, त्याला सामान्य बनवण्यास तत्त्वज्ञान सहाय्यक ठरते. ४) तत्त्वज्ञानाचा उगम जिज्ञासेतून होतो. मग ही जिज्ञासा कुठून निर्माण होते ? तर त्यास एकच उत्तर आहे की विज्ञानाचा मुख्य आधार असलेल्या दृश्य जगातूनच ही जिज्ञासा निर्माण होते.

सारांश, विज्ञान आणि तत्त्वज्ञान काही बाबतीत परस्परभिन्न असले तरी ते परस्पर विरोधी नाहीत उलट त्यांच्यात अंश-पूर्णाचा संबंध आहे. डॉ.हर्बर्ट डिंजल यांच्या मते 'विज्ञानाने सांगितलेल्या मार्गाने व्यवस्थितपणे गेल्यास वैज्ञानिक अभ्यासाची परिणती तत्त्वज्ञानात होते.'

### तत्त्वज्ञान आणि धर्म (Philosophy and Religion) :

धर्म मानवी जीवनाचे अभिन्न अंग आहे. प्रत्येक व्यक्तीची धर्म संकल्पनेवर श्रद्धा असते. व्यक्तीला जेव्हा याची जाणीव झाली की आपण स्वतः अपूर्ण आहोत तेव्हा या अपूर्णतेच्या पाठीमागे काहीतरी पूर्णत्व असणारी शक्ती असली पाहिजे. शिवाय या विश्वाच्या निर्मितीचे काहीतरी कारण असले पाहिजे. त्याच्या शोधाच्या प्रेरणेतून ईश्वर संकल्पनेची निर्मिती झाली. हीच धर्मभावनेची सुरूवात होय. असेही मानले जाते की धर्माचा उदय भीतीतून झाला. मानव स्वतःच्या संसारिक दुःखाने, कष्टाने भयभीत झाला आणि या दुःख कष्टातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी त्याने धर्म कल्पनेची निर्मिती केली.

तत्त्वज्ञान आणि धर्मात काही भेद आहेत.



१. तत्त्वज्ञानाचा उगम जिज्ञासेतून झाला असे मानले जाते. तर धर्माचा उदय भीतीतून व अपूर्णतेच्या भावनेतून झाला. दोहोंच्या उदयाची कारणे भिन्न आहेत.

२. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची पद्धती बौद्धिक आहे. तर याउलट धर्मात भावनेला प्राधान्य दिले जाते.

३. मानवी जीवन व विश्वाचे बौद्धिक स्पष्टीकरण देणे हे तत्त्वज्ञानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याउलट धर्माचे उद्दिष्ट भिन्न आहे. कोणताही धर्म प्रामुख्याने मोक्षाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतो.

४. काही विचारवंत तत्त्वज्ञानास सैद्धांतिक मानतात तर धर्मास व्यावहारिक मानतात.

असे असले तरी तत्त्वज्ञान आणि धर्मात अतूट असा संबंध आहे. कारण -

१. दोहोंच्या विचारांचे केंद्र मानव हेच आहे, अभ्यास विषय विश्व हेच आहे. फरक एवढाच की तत्त्वज्ञान मानवी अनुभवांची व्यवस्था लावण्यासाठी विश्वाच्या आधारभूत तत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. धर्म अध्यात्मिक मूल्यांच्या आधारे विश्वाची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करतो.

२. धर्माचे उद्दिष्ट मोक्षास सहाय्यक बनने हे आहे. तर तत्त्वज्ञान धर्माने प्रतिपादन केलेल्या मोक्षमार्गाचे व्यवस्थित मूल्यमापन करते.

३. धर्मात अनेक अंधविश्वास, रूढी तसेच कर्मकांड असतात. ज्यामुळे धर्माचे मूळ स्वरूप बिघडून जाते. अशावेळी या सर्व गोष्टींचे विश्लेषण करून तत्त्वज्ञान योग्य काय व अयोग्य काय याचा निर्देश करून धर्मांच्या मुलभूत तत्त्वांचा परिचय करून देते.

४. तत्त्वज्ञानाचे ध्येय सत्याचा शोध घेणे हे आहे. त्यासाठी धर्मच प्रोत्साहन देत असतो.

५. अलौकिक स्वरूपाच्या अनुभूती समजून घेण्यासाठी धर्मच तत्त्वज्ञानास सहाय्यक ठरत असतो.

सारांश, तत्त्वज्ञान व धर्म काही बाबतीत परस्पर भिन्न वाटत असले तरी त्या दोहोंत आंतरिक संबंध आहे. ते दोन्ही परस्परपूरक आहेत.

०००

## २.

# नीतिशास्त्र

# (Ethics)

मानव भटक्या व विस्कळीत जीवनापासून मुक्त होऊन स्थिर व एकसंध अशा स्वरूपाचे जीवन जगू लागला, तेव्हा 'समाज' निर्माण झाला. स्वाभाविकच त्याने सर्वांना समान रितीने लागू असणारे काही सामाजिक नियम तयार केले. या नियमांचे पालन सर्वांसाठी बंधनकारक केले. समाजाच्या प्राथमिक अवस्थेत हे नियम सर्वजण निमुटपणे पाळत असत. 'परंतु हे नियम का पाळायचे ?' असा साधा विचारही कुणी करत नसे. समाज जसं जसा प्रगत होत गेला तस तसा त्या समाजात स्वतंत्र बुद्धीने विचार करणाऱ्या व्यक्ती निर्माण होऊ लागल्या. परंपरेने रूढ केलेले नियम आपण जसेच्या तसे का पाळावेत ? त्यात काही कालबाह्य झालेले नियम आहेत का ? काही अविवेकी नियम आहेत का ? असा विचार या अनुषंगाने होऊ लागला. त्यातूनच नीतिशास्त्राचा जन्म झाला.

नीतिशास्त्रास इंग्रजीत Ethics असे म्हणतात. Ethics हा शब्द ग्रीक भाषेतील Ethos या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ चालीरीती किंवा सवय असा होतो. Ethics ला इंग्रजीत Moral Philosophy असेही म्हणतात. इंग्रजीतील Moral हा शब्द लॅटीन भाषेतील Mores या शब्दापासून आला आहे. त्याचाही अर्थ रूढी किंवा सवयी असाच होतो. म्हणून Ethics चा शब्दश: अर्थ घेतल्यास 'नीतिशास्त्र म्हणजे रूढी चालीरिती किंवा सवयींचा अभ्यास करणारे शास्त्र' अशी प्राथमिक व्याख्या तयार होते.



परंतु प्रश्न असा आहे की मानवी समाजात प्रचलित असलेल्या या रूढी, परंपरा, चालीरीती किंवा सवयींचे दर्शन आपल्याला होते कसे ? तर याला असे उत्तर आहे की, या अशा गोष्टींचे दर्शन आपल्याला आचरणातून किंवा मानवी वर्तनातून घडत असते. म्हणून रूढी किंवा सवयी या आचरणाचाच एक भाग आहेत. त्या दृष्टिने 'नीतिशास्त्र म्हणजे आचरणाचा अभ्यास करणारे शास्त्र' अशी व्याख्या तयार करता येते.

या ठिकाणी असाही प्रश्न निर्माण होतो की, आचरण किंवा वर्तन हा जसा नीतिशास्त्राचा अभ्यासविषय आहे तसा तो मानसशास्त्राचाही अभ्यासविषय आहे. मग दोहोत नेमका भेद कोणता ? याला असे उत्तर देता येते की मानसशास्त्र आचरणाचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करते. वर्तन म्हणजे काय ? वर्तन कसे घडते ? वर्तनाचे घटक कोणते ? असे प्रश्न मानसशास्त्रात उपस्थित केले जातात. तर याउलट नीतिशास्त्र वर्तनाचा (आचरणाचा) आदर्शात्मक अभ्यास करते. 'आचरण कसे असावे ? किंवा कोणते आचरण चांगले ?' असे प्रश्न नीतिशास्त्रात उपस्थित केले जातात. एका दृष्टिने आचरणावर चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, उचित-अनुचित असे नीतिनिर्णय नीतिशास्त्रात दिले जातात. म्हणून 'आचरणावर दिल्या जाणाऱ्या नीतिनिर्णयांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र' अशी व्याख्या तयार होते.

कोणत्याही आचरणावर नीतिनिर्णय देताना त्याचा निकष कोणता ? असाही प्रश्न या संदर्भात निर्माण होतो. कोणत्या निकषाच्या आधारे एखादे आचरण चांगले किंवा वाईट ठरवायचे ? कारण बरेचदा व्यवहारात अशी अडचण निर्माण होते की, एकच आचरण एका दृष्टिने योग्य वाटते तर दुसऱ्या दृष्टिने अयोग्य वाटते. अशावेळी निर्णय देता येत नाही. यालाच 'धर्मसंकट' असे म्हणतात. महाभारतात अर्जुनापुढे असेच धर्मसंकट निर्माण झाले होते. 'लढावे की लढू नये ?' असा प्रश्न त्याच्यासमोर होता. लढले तर स्वकीय, आप्तेष्टांच्या हत्येचे पातक लागेल, न लढावे तर क्षत्रिय धर्म न पाळल्याचे पातक लागेल अशा संभ्रमात तो होता. अशी अडचणीची स्थिती

प्रत्येकाच्या जीवनात नेहमीच निर्माण होतो. योग्य निर्णय घ्यावा असा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी समाज हित लक्षात घेऊन काही आदर्श किंवा ध्येये बनवलेली असतात. त्यांचा आधार घ्यावा लागतो. एवढेच नाही तर त्या ध्येयांप्रत जाण्यासाठी काही विशिष्ट नियमही असतात, त्या नियमांचाही आधार घ्यावा लागतो. म्हणून वरील तीन व्याख्यांच्या पार्श्वभूमीवर आपल्याला नीतिशास्त्राची सर्वसमावेशक व्याख्या तयार करता येते. "आचरणावर दिले जाणारे नीतिनिर्णय, ते देताना आधारभूत ठरलेले ध्येय व त्या ध्येयास उपयुक्त ठरणारे नियम या सर्वांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र."

पॉल्सन (Paulsen) यांच्या मते 'रूढी किंवा नैतिकतेचे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र होय.'

मॅकेन्झी (Mackenzie) यांच्या मते, 'नीतिशास्त्र म्हणजे आचरणाची इष्टता किंवा योग्यतेसंबंधी एक चिकित्सा होय.'

लिली (Lillie) यांच्या मते, 'नीतिशास्त्र हे समाजात राहणाऱ्या मानवांच्या आचरणाचे आदर्श शास्त्र असून या आचरणाच्या योग्य-अयोग्यतेविषयी, इष्ट-अनिष्टतेविषयी निर्णय देणारे शास्त्र आहे.'

विविध विचारवंतानी वर प्रतिपादन केलेल्या व्याख्यांचा आशय आपण सुरूवातीला केलेल्या व्याख्यांमध्ये आला आहेच. तरी पण सर्व व्याख्यांमध्ये दोन घटक समान रीतीने आढळतात. १) नीतिशास्त्राचा अभ्यास विषय मानवी आचरण हा आहे. २) नीतिशास्त्रात आचरणाचा आदर्शात्मक किंवा मूल्यात्मक विचार केला जातो.

## अतिनीतिशास्त्र (Meta Ethics) :

अतिनीतिशास्त्रास विश्लेषक नीतिशास्त्र (Analytic Ethics) असेही म्हणतात. नीतिशास्त्राच्या या शाखेत अभ्यासविषयाचे वर्णनात्मक अध्ययन करण्याऐवजी विश्लेषणात्मक अध्ययन केले जाते. हे अध्ययन प्रामुख्याने नैतिक भाषेचे स्वरूप आणि अर्थाच्या अनुषंगाने केले जाते. नैतिक सिद्धांत अथवा नैतिक नियमांचे प्रतिपादन करण्याचे कार्य अतिनीतिशास्त्राचे नाही. ते कार्य आदर्शात्मक नीतिशास्त्र करते. मानवी आचरण योग्य-अयोग्य, चांगले वाईट आहे? ते कसे ठरवले पाहिजेत? असा ठरवण्याचे निकष कोणते ? हे निकष कोणत्या ध्येयानुसार ठरवले पाहिजेत? अशा अनेक प्रश्नांचा विचार आदर्शात्मक नीतिशास्त्रात केला जातो. हा विचार करत असताना आपण एक विशिष्ट प्रकारची भाषा किंवा विशिष्ट नीतिशास्त्रीय संकल्पनांचा वापर करत असतो. ही भाषा किंवा या संकल्पनांचा निर्दोष असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण ही भाषा किंवा या संकल्पना जर सदोष असतील तर त्यामुळे वैचारिक गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. किंबहुना आपल्या समोर निर्माण झालेले प्रश्न सुटण्याऐवजी ते अधिक गुंतागुंतीचे बनण्याची शक्यता असते. म्हणून जोपर्यंत नैतिक भाषा किंवा संकल्पना निश्चित आणि स्पष्ट असणार नाहीत, तोपर्यंत मानवी आचरणाचा अभ्यासही व्यवस्थित करता येणार नाही. व्यक्तीचे कोणते आचरण योग्य किंवा उचित ठरते ? हे ठरवत असताना योग्य किंवा उचित या शब्दांचा नेमका अर्थ आपल्याला माहिती असणे आवश्यक ठरते. म्हणून नैतिक भाषेविषयीचा विचार ज्या अभ्यासशाखेत केला जातो त्यास अतिनीतिशास्त्र असे म्हणतात. स्थूलमानाने ज्याला नीतिशास्त्र म्हणतात. (आदर्शात्मक नीतिशास्त्र), त्यात मानवी आचरणाचा प्रत्यक्ष अभ्यास केला जातो. याउलट अतिनीतिशास्त्रात मानवी आचरणाचा अभ्यास करताना त्या आचरणाविषयी ज्या भाषेचा, विधानांचा किंवा संकल्पनांचा वापर केला जातो. त्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला जातो.

**उपयोजित नीतिशास्त्र (Applied Ethics) :** ही नीतिशास्त्राची अशी शाखा आहे की जी वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनातील अशा काही विशिष्ट गोष्टींचे नैतिक दृष्टिकोनातून तात्त्विक परीक्षण करते की, ज्यांच्या विषयी नैतिक निर्णय दिले जातात. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, [illegible] नीतिशी निगडीत विविध क्षेत्रातील नैतिकदृष्ट्या योग्य कृतींची तात्त्विक पद्धतीने चिकित्सा उपयोजित नीतिशास्त्रात केली जाते. उदा. जैवनीतिशास्त्रात दयामृत्यू किंवा भ्रूणहत्या यासारख्या

विषयाच्या अनुषंगाने नैतिकदृष्ट्या योग्य दृष्टिकोन कोणता?-याचा विचार केला जातो. पर्यावरण नीतिशास्त्रात भूप्रदेश किंवा इतर सजीवांप्रती मानवाची कर्तव्ये कोणती आहेत? याचा विचार केला जातो. तर व्यापार नीतिशास्त्रात व्यापाऱ्याची ग्राहकाप्रती किंवा मजुरांप्रती कोणती कर्तव्ये असावीत? याची चर्चा केली जाते. उपयोजित नीतिशास्त्र हे नैतिकतेचे निकष प्रतिपादन करणाऱ्या आदर्शात्मक नीतिशास्त्रापेक्षा वेगळे आहे. तसेच ते नैतिक विधानांची चिकित्सा करणाऱ्या अतिनीतिशास्त्राहूनही वेगळे आहे.

**नीतिशास्त्राचे स्वरूप (Nature of Ethics) :**

**१) नीतिशास्त्र हे शास्त्र आहे :-**

कोणत्याही ज्ञानास शास्त्र असे म्हटले जात नाही, तर जी ज्ञानरचना तात्त्विक, सामान्य व सुसंगत असते तिलाच शास्त्र असे म्हटले जाते. जे ज्ञान केवळ ज्ञानासाठी ज्ञान (Knowledge for the sake of knowledge) अशा भावनेतून निर्माण झालेले असते, ज्यात कसलीही व्यावहारिकता पाहिली जात नाही असे ज्ञान तात्त्विक समजले जाते. ज्या ज्ञानात एखाद्या विशिष्ट गोष्टी विषयी विचार नसतो तर सर्वसमावेशक बाबींचा विचार केलेला असतो असे ज्ञान सामान्य समजले जाते. तर ज्या ज्ञानाची पद्धतशीर, सुसंबद्ध मांडणी केलेली असते त्या ज्ञानास सुसंगत समजले जाते. शास्त्ररचनेत या तिन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. नीतिशास्त्राचा उद्देश-माणसे नैतिक बनवणे हा नाही तर नैतिकतेचा मार्ग दाखवणे, नैतिकता जाणून घेणे हा आहे. त्यामुळे ते तात्त्विक आहे. नीतिशास्त्र एखाद्या विशिष्ट व्यक्तींच्या कर्मांच्या किंवा विशिष्ट कर्मप्रकाराचा विचार करत नाही तर सामान्य स्वरूपी कर्म प्रकाराचा विचार करते म्हणून ते सामान्य आहे. तसेच ते नैतिक जीवनातील आदर्शानुसार कर्मांची (आचरणाची) संगती लावण्याचा प्रयत्न करते म्हणून ते सुसंगत आहे. म्हणून नीतिशास्त्र हे शास्त्र आहे.

**२) नीतिशास्त्र आदर्शवादी शास्त्र आहे :-**

शास्त्रांचे दोन प्रकार आहेत. वस्तुनिष्ठ शास्त्रे व आदर्शवादी शास्त्रे. वस्तुनिष्ठ शास्त्रात कोणत्याही घटकांचा अभ्यास तटस्थपणे केला जातो. या शास्त्रांची प्रवृत्ती 'अमुक म्हणजे काय आहे ?' (What it is ?) अशी असते. उदा. भौतिकशास्त्र, जीवशास्त्र अशा शास्त्रांची प्रवृत्ती विषयाकडे तटस्थपणे पाहण्याची असते. आदर्शवादी शास्त्रात कोणत्याही घटकांचा अभ्यास आदर्शात्मक दृष्टिकोनातून केला जातो. या शास्त्रांची प्रवृत्ती 'अमुक कसे असावे ?' (What ought to be) अशी असते. उदा- तर्कशास्त्रात युक्तीवाद कसे असावेत असा आदर्शात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. या दृष्टिने नीतिशास्त्र आदर्शवादीशास्त्र आहे. नीतिशास्त्र काही नीतिनिकषांच्या आधारे व्यक्तीच्या आचरणाचे मूल्यमापन करते, आचरण कसे असावे ? हे सांगण्याचा प्रयत्न करते.

**३) नीतिशास्त्र व्यावहारिक शास्त्र आहे :**

काही विचारवंतांच्या मते नीतिशास्त्र व्यावहारिक शास्त्र आहे. सुरुवातीला आपण नीतिशास्त्र हे तात्त्विक आहे असे म्हटले. जे तात्त्विक आहे ते व्यावहारिक असत नाही. असाही युक्तीवाद आपण पाहिला तरीपण नीतिशास्त्राचा आपल्याला मानवी व्यवहारापासून फारकत करता येत नाही. नीतिशास्त्र माणसाला नैतिक बनवत नाही हे खरे असले तरी त्याचा प्रत्यक्ष मानवी आचरणाशी संबंध असल्यामुळे त्याला व्यावहारिक समजणे तेवढे चूक ठरणार नाही. मानसशास्त्राप्रमाणे अगदी प्राथमिक स्वरूपाचा नसला तरी दुय्यम, गौण स्वरूपाचा संबंध असल्याने नीतिशास्त्र काही प्रमाणात व्यावहारिक आहे.

**४) नीतिशास्त्र कला नाही :-**

कलेचा संबंध प्रत्यक्ष कला वस्तुशी असतो. मनात कितीही चांगला संकल्प

असला तरी जोपर्यंत कलावस्तू निर्माण होत नाही तोपर्यंत त्याला कला म्हणता येत नाही. शिल्पकाराच्या मनात कितीही चांगला संकल्प असला तरी जोपर्यंत शिल्प तयार होत नाही तोपर्यंत त्यास कला संबोधले जात नाही. म्हणजेच कलेचे मूल्य संकल्पापेक्षा प्रत्यक्ष कला निर्मितीवरून ठरले जाते. याउलट नैतिकतेचा खरा संबंध प्रत्यक्ष कृतीपेक्षा कृतीमागे असणाऱ्या संकल्पाशी असतो. कोणतीही कृती व्यक्तीसापेक्ष व परिस्थिती सापेक्ष असते. व्यक्तीच्या मनात कितीही चांगला संकल्प असला तरी कृतीमात्र तशीच घडेल हे सांगता येत नाही. कधी-कधी संकल्प वाईट असूनही कृती मात्र चांगली घडण्याची शक्यता असते. त्यामुळे नैतिकता ही कृतीत नसते तर त्यामागे असणाऱ्या संकल्पात असते. नीतिशास्त्राचा संबंध संकल्पाशी असल्याने त्याला कला म्हणता येत नाही.

## नीतिशास्त्रातील समस्या (Problems of Ethics) :

नीतिशास्त्र हे मानवी जीवनातील आदर्शांचा किंवा साध्यांचा विचार करणारे शास्त्र आहे. म्हणून नीतिशास्त्राची प्रमुख समस्या जीवनाचे आदर्श किंवा अंतिम साध्य कोणते ? त्यासाठी साधने कोणती ? याचा शोध घेणे ही आहे. तरीही जेम्स सेथ (James Seth) यांनी काही नैतिक समस्यांचा उल्लेख केला आहे. त्या खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) मानवी जीवनाचे अंतिम ध्येय कोणते ? त्याच्या प्राप्तीची साधने कोणती ? यांचा शोध घेणे ही नीतिशास्त्राची प्रमुख समस्या आहे.

२) दुसरी समस्या 'योग्य' (Right) म्हणजे काय ? एखादी कृती कशामुळे [illegible] अयोग्य ठरते ? योग्यता (Rightness) ही श्रेष्ठत्व (Goodness) [illegible] ठरते ?

३) [illegible] अनेक प्रकार आहेत. कोणत्या [illegible] नैतिक [illegible] म्हणून सर्व [illegible] शकते ? ही एक [illegible] समस्या आहे.

४) नैतिक ज्ञानाचा मूलभूत स्रोत कोणता [illegible] (A Priori) आहे की आधुनिक (Empirical) किंवा अनुभवोत्तर (A posteriori) आहे ? ही चौथी समस्या आहे. त्याचा शोध घेणे हा नीतिशास्त्राचा प्रयत्न असतो.

५) पाचवी समस्या सद्गुण म्हणजे काय ? किंवा सद्गुणाचे प्रकार किती ? यांचा शोध घेणे ही आहे.

६) मानवी जीवनात सुखाचे (Pleasure) नेमके स्थान कोणते ? सुख हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय ठरू शकते का ? याचा शोध घेणे ही एक समस्या आहे. सुखवादी सुख हेच अंतिम ध्येय मानतात तर बुद्धीवादी सतसंकल्परूपी बुद्धीच्या आदेशाप्रमाणे वागणे हे मानवी जीवनाचे ध्येय समजतात.

७) सातवी समस्या अशी की नैतिकतेचा खरा निकष कोणता ? व्यक्ती की समाज? वैयक्तिक कल्याणाचा विचार उचित ठरतो की सामाजिक कल्याणाचा विचार उचित ठरतो ?

८) मानवी जातीच्या कल्याणाच्या अनुषंगाने स्वार्थ त्यागाचे (Self Sarifice) स्वरूप व मानवी जीवनातील स्थान नेमके कसे आहे ? याचा विचार करणे ही देखील एक समस्या आहे.

अशा काही प्रमुख प्रश्नांचा किंवा समस्यांचा विचार नीतिशास्त्रात केला जातो.

## काही मूलभूत नैतिक संकल्पना (Basic Moral Concepts)

### १) योग्य किंवा सम्यक (Right) :

Right हा शब्द लॅटीन भाषेतील 'Rectus' या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ 'According to rule' म्हणजे 'नियमानुसार' असा होतो. म्हणजेच जे जे नियमानुसार असते ते ते सर्व योग्य असते. 'क्ष' योग्य आहे याचा 'क्ष' नियमानुसार आहे. आणि 'क्ष' अयोग्य आहे याचा अर्थ 'क्ष' नियमानुसार नाही. भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने बौद्ध आणि जैन दर्शनांनी वापरलेला सम्यक हा

शब्द वरील अर्थच सूचित करतो. कारण मानवी आचरण कसे असावे याचे नियम सांगताना प्रत्येक नियमापुढे सम्यक हा शब्द लावलेला आहे. उदा. सम्यक संकल्प, सम्यक कर्म, सम्यक चरित्र इ. या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की आचरणविषयक कोणत्याही नियमाचे स्वतंत्र अस्तित्त्व नसते. प्रत्येक नियम हा कोणत्या ना कोणत्या ध्येयाशी निगडीत असतोच. अमुक एखादे ध्येय साध्य करावयाचे आहे म्हणून अमुक नियमांचे पालन केले पाहिजे असे आपण मानतो. म्हणूनच योग्य किंवा अयोग्य हे जीवनातील ध्येयावरून ठरत असते.

## २) इष्ट किंवा शिव (Good) :

Good हा शब्द जर्मन भाषेतील 'Gut' या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ 'Valuable for some end' म्हणजेच 'कोणत्याही ध्येयास उपयुक्त असणारे' असा होतो. म्हणून ज्या ज्या गोष्टी कोणत्या ना कोणत्या तरी ध्येयास उपयुक्त असतात त्यांना इष्ट, चांगले किंवा शुभ असे म्हणतात. 'क्ष इष्ट आहे' याचा अर्थ 'क्ष' हे कोणत्या तरी ध्येयास उपयुक्त आहे. 'क्ष' अनिष्ट आहे' या अर्थ 'क्ष' हे कोणत्यातरी ध्येयास बाधक आहे.

कधी कधी 'इष्ट' हा शब्द व्यापक अर्थाने देखील वापरला जातो. इष्ट हा शब्द ध्येयास उपयुक्त ठरणाऱ्या साधनांनाच वापरला जातो असे नाही. तर मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयासही 'शिवतत्त्व' (The Ultimae Good) असे म्हणतात. विल्यम फ्रँकेना यांनी इष्ट किंवा चांगले या शब्दाच्या निरनिराळ्या उपयोगावरून हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

१) एखाद्या गोष्टीच्या उपयुक्ततेवरून तिला चांगले म्हणता येते. उदा. काठी चांगली आहे कारण तिची मदत करता येईल.

२) एखाद्या साध्याचे साधन म्हणून उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टींना चांगले म्हणता येते. उदा. आरोग्यासाठी व्यायाम करणे चांगले आहे.

३) आस्वाद घेता येऊ शकणाऱ्या सुंदर गोष्टींना चांगले म्हणता येऊ शकते.



उदा. फुलपाखरू सुंदर असतात, निसर्ग सुंदर असतो म्हणून तो चांगला असतो.

४) एखाद्या वस्तुच्या अंगभूत गुणामुळे तिला चांगले म्हणता येते. उदा. सुरी चांगली आहे. कारण ती धारदार, चांगल्या मुठीची आहे.

५) काही गोष्टी स्वतःच चांगल्या असतात. उदा.ज्ञान, सौंदर्य या गोष्टी स्वतःच चांगल्या असतात.

मूरच्या मते चांगले किंवा इष्ट अशी संकल्पना आहे की त्याची अवयवरूप व्याख्या करता येत नाही. इष्ट ही सरळ, शुद्ध, निर्भेळ संकल्पना आहे. तिची इतर संकल्पनांच्या सहाय्याने व्याख्या होऊ शकत नाही. इष्ट म्हणजे इष्ट.

## ३) मूल्य (Value) :

मूल्य ही संकल्पना प्रामुख्याने अर्थशास्त्राकडून आलेली संकल्पना आहे. अर्थशास्त्रात 'मानवी गरज किंवा इच्छा यांची पूर्ती करणारी वस्तू म्हणजे मूल्य' (Value means anything that satisfies human wants or desire) अशी व्याख्या करण्यात येते. उदा. अन्न, भूक शमविते, पाणी तहान भागविते म्हणून अन्न, पाणी ही मानवी जीवनातील मूल्ये होत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास 'जी वस्तू आपले जीवन पुढे नेते, जीवनाची लांबी वाढविते (Value is anything that furthers our lives) तिला मूल्य असे म्हणतात. या दृष्टीने व्याख्या मानवी जीवनाची वृद्धी करणाऱ्या मूल्यांशी निगडीत असल्याने अशा मूल्यांना जीवनविषयक मूल्ये असे म्हणतात. मानव हाच सर्व गोष्टींचा मानदंड असल्याने मानवी जीवनाची वृद्धी होणे आवश्यक आहे. या दृष्टिने जीवनविषयक मूल्यांचा विचारही मूलभूत ठरतो.

परंतु मनुष्य हा केवळ पेशींचा समूह नाही किंवा केवळ पशुपातळीवर जीवन जगणारा प्राणीही नाही. तर नैतिक व विवेकी जीवन जगत असतो. असे जीवन जगत असताना त्याचे अंतिम ध्येय आत्मकल्याण साधने हे असते. हे अंतिम

ध्येय साध्य करण्यासाठी जी मूल्ये उपयुक्त ठरतात त्यांना नैतिक मूल्य असे म्हणतात.

वरील मूल्यांपैकी जी जीवनविषयक मूल्ये आहेत त्यांना साधनरूप (Instrumental) असे म्हणतात तर नैतिक मूल्यांना साध्यरूप मूल्ये (Intrinsic) असे म्हणतात. आपल्याला एखाद्या गोष्टीबद्दल वाटणारे महत्त्व म्हणजे मूल्य. आपल्याला इष्ट वाटणाऱ्या कोणत्याही गोष्टीत मूल्य असते. त्यापैकी काही गोष्टी इतर गोष्टींच्या प्राप्तीसाठी साधन म्हणून कार्य करत असतात, त्यांना स्वतः मूल्य असते. उदा. औषधे, अन्न. तर ज्या गोष्टी इतरांसाठी साधन न ठरता त्या स्वतःच्या ठिकाणी असणाऱ्या महत्त्वामुळे पाहिजे असतात. त्यांना स्वतोमूल्य असते.

सामान्यतः सत्य (Truth), शिव (Good), आणि सुंदर (Beauty) ही तीन नैतिक मूल्ये साध्यरूप मूल्ये समजली जातात. सत्य हे मूल्य बुद्धीशी तर सुंदर हे मूल्य भावनेशी निगडीत असते. या दोन्ही मूल्यांचा समन्वय 'शिव' किंवा सद्गुणात होतो. म्हणून त्यास अंतिम मूल्य (Ultimate Value) असेही म्हणतात. नैतिक मूल्ये एकाचवेळी वस्तुनिष्ठ व व्यक्तीनिष्ठ असतात. वस्तुनिष्ठ यासाठी की ती सर्वंकष व सार्वकालिक असतात. व्यक्तीनिष्ठ यासाठी असतात की त्यांची जाणीव व्यक्तीलाच होते, व्यक्तीच्या जीवनातूनच ही साकार होत असतात.

## ४) सद्गुण (Virtue) :

सद्गुण या शब्दाचा शब्दशः अर्थ 'चांगला गुण' असा करता येतो परंतु चांगला गुण म्हणजे कोणता गुण हे ठरविणे अवघड आहे. व्यक्तीने सद्गुणी असले पाहिजे म्हणजे नेमके कोणते गुण त्याने अंगी बाणवले पाहिजे हे आपल्याला कळले पाहिजे.

'सद्गुण' हा शब्द इंग्रजी 'Virtue' या शब्दाचा पर्याय आहे. Virtue हा शब्द Vir या लॅटीन शब्दापासून तयार झाला असून त्याचा मूळ अर्थ पुरूष (Man)



किंवा नायक (Hero) असा आहे. लाक्षणिक अर्थाने त्याचा अर्थ 'सर्वकल्याण साधणारी सवय' असा होतो. माणसाला दोन प्रकारच्या सवयी असतात. अजाणतेपणाने पडलेल्या सवयी. उदा. बसल्या ठिकाणी पाय हलविणे, हाताची नखे कुरतडणे यासारख्या सवयी ज्यांचा संकल्पाशी काही संबंध नसतो. या उलट काही सवयी आपण हेतुपुरस्सरपणे लावून घेत असतो. या सवयी संकल्पाशी व जीवनविषयक ध्येयाशी निगडीत असतात. सद्गुणाचा संबंध या अशा सवयींशी असतो. म्हणून 'जीवनाच्या अंतिम ध्येयानुसार वागण्याची संकल्पाला लागलेली सवय म्हणजे सद्गुण' अशी सर्वसमावेशक व्याख्या केली जाते.

'सद्गुण' या शब्दाचा अर्थ दोन दृष्टिकोनातून सांगितला जातो. वैयक्तिक दृष्टिकोनातून सद्गुण म्हणजे आपल्या प्रवृत्ती, भावभावना, इच्छा तसेच आचरणात नियंत्रित करणे होय. सामाजिक दृष्टिकोनातून सामाजिक स्थैर्यासाठी, हितासाठी केलेली कृती म्हणजे सद्गुण होय.

सॉक्रेटिसच्या मते 'ज्ञान हाच सद्गुण आहे.' एखादी व्यक्ती वाईट वागते याचे कारण तिला तिच्या वागण्याच्या गंभीर परिणामांची जाणीव नसते. तसेच जीवनाचे ध्येय कोणते याचेही ज्ञान नसते. या गोष्टींची जाणीव किंवा ज्ञान करून दिले तर ती आपोआपच सद्गुणी बनेल.

ॲरिस्टॉटलच्या मते 'आचरणातील किंवा विचारातील सुसंवादित्व म्हणजे सद्गुण होय.' हे सुसंवादित्व अतिरेक किंवा न्यूनत्वात नसून त्यांच्या सुवर्णमध्यात असते. म्हणून 'दोन अतिरेकी टोकातील सुवर्णमध्य म्हणजे सद्गुण होय.'

सुखवादी विचारसरणी सुख प्राप्त करून देणाऱ्या कोणत्याही आचरणास सद्गुण मानते तर बुद्धीवादाच्या मते बुद्धीच्या आदेशानुसार होणारे आचरण म्हणजे सद्गुण होय. व्यक्तीहितवादाच्या मते ज्या योगे व्यक्तीचे हित साधले जाईल असे आचरण म्हणजे सद्गुण होय. समाजहितवादाच्या मते ज्या योगे समाजाचे हित

साधले जाईल असे आचरण म्हणजे सद्गुण होय.

सुखवाद, बुद्धीवाद, व्यक्तीहितवाद, समाजहितवाद यांचा दृष्टिकोन एकांगी स्वरूपाचा असल्याने या व्याख्याही एकांगीच आहेत. वास्तविक कोणताही विचार समन्वयात्मक असला पाहिजे. आत्म्याचे पूर्णत्व कोणत्याही घटकाच्या उदात्तीकरणात नाही तर दोन्ही घटकांच्या समन्वयात आहे म्हणून सर्वकल्याणवादाच्या मते 'आपल्या विविध वृत्तींचे नियमन करून त्यांना योग्य दिशा देण्याचा आत्म्याचा जो धर्म आहे त्यास सद्गुण असे म्हणतात.'

## ५) दुरित (Evil) :

सर्वसामान्यपणे सर्व चांगल्या (Good) गोष्टींच्या विरूद्ध असलेली दुष्कृत्ये किंवा अनैतिकता म्हणजे दुरित होय. ईश्वराने निर्माण केलेला माणूस चांगला असला पाहिजे, सद्गुणी असला पाहिजे असा स्वाभाविक विचार आपण करतो. परंतु तशी वस्तुस्थिती नसते. तो जर चांगला किंवा सद्गुणी असता तर जगात कोणतीही नैतिक समस्या निर्माण झाली नसती. मुळात माणसानेच आपल्या वर्तनातून दुरिताची निर्मिती केली आहे.

व्यवहारात अनैतिक हा शब्द पाप, गुन्हा, दुर्गुण यांच्या संदर्भात समान रीतीने वापरला जातो. अर्थात या सर्व गोष्टी दुरितच आहेत. पाप (Sin) ही संकल्पना धार्मिक आहे तर गुन्हा (Crime) ही संकल्पना राजकीय स्वरूपाची आहे. धार्मिक नियमांचे [illegible] केले तर ते पाप ठरते तर राजकीय नियमांचे उल्लंघन गुन्हा ठरतो. [illegible] संबंध व्यक्तीच्या बाह्य स्वरूपी कृतीशी असतो.

[illegible] म्हणून आपल्या चारित्र्याला अधिक महत्त्व दिले पाहिजे [illegible] चारित्र्याचा संबंध जसा आपल्या आंतरिक जीवनाशी असतो [illegible] रीतीने [illegible]. म्हणून चारित्र्याच्या अनैतिकतेस दुर्गुण (Vice) असे म्हणतात. नैतिक नियमांचे उल्लंघन करण्याची लागलेली सवय म्हणजे दुर्गुण होय.

मानवाच्या जीवनात निर्माण झालेले विशेषतः मानवनिर्मित दुःख किंवा क्लेष यालाही दुरितच मानले जाते.

सारांश, वरील सर्व संकल्पनांमध्ये एक समानता दिसून येते. पाप, गुन्हा, दुर्गुण, मानवनिर्मित दुःख या सर्व गोष्टींचे व्यक्तीवर तसेच समाजावर वाईट परिणाम होत असतात. म्हणून ज्या ज्या गोष्टी मानवी जीवनाचे अहित करणाऱ्या आहेत, त्या सर्वांना दुरित समजण्यास हरकत नाही.

०००

३.

# सुखवादी नीतिशास्त्र

# (Hedonistic Ethics)

सुखवाद ही नीतिशास्त्रातील एक प्रमुख उपपत्ती आहे. नैतिकतेचा एक महत्त्वाचा निकष म्हणून सुखवादाकडे पाहिले जाते. 'सुख हा नैतिकतेचा अंतिम निकष होय' असे प्रतिपादन करणाऱ्या सिद्धांतास सुखवाद असे म्हणतात. सुखवादानुसार अशीच कृती नैतिक ठरते की ज्या कृतीपासून व्यक्तीला सुख मिळते.

भावना व बुद्धी हे आत्म्याचे दोन घटक मानले जातात. किंबहुना या दोहोंचे एकात्मस्वरूप म्हणजेच आत्मा होय. भावना व बुद्धी हे दोन्ही घटक व्यक्तीस आचरण विषयक आदेश देत असतात. आपली सत्संकल्परूपी बुद्धी आपल्याला मानव म्हणून पाळावयाच्या कर्तव्यांचे आदेश देत असते. असे आदेश सुख दुःखाचा विचार न करता केवळ कर्तव्यभावनेतून पाळावयाचे असतात. याउलट भावनेचे आदेश प्रायः सुख निर्माण करणारे असतात. म्हणून असेच आदेश आपण पाळले पाहिजेत असे सुखवादाचे प्रतिपादन आहे. 'भावनेच्या आदेशाप्रमाणे आचरण करण्यातच व्यक्तीचे आत्मकल्याण समावलेले आहे.' असे प्रतीपादन करणाऱ्या सिद्धांतास सुखवाद असे म्हणतात.

व्यक्तीच्या आचरणाचे मूल्यमापन करत असताना ते दोन तऱ्हेने केले जाते. [illegible] आचरणामागील हेतू पाहून आचरण इष्ट-अनिष्ट ठरविले जाते किंवा [illegible] होणारे परिणाम पाहून आचरण इष्ट किंवा अनिष्ट ठरविले जाते. [illegible] हेतूला प्राधान्य द्यावे की परिणामास प्राधान्य द्यावे असा प्रश्न



निर्माण होतो. ज्या विचारानुसार आचरणातून निर्माण होणाऱ्या परिणामांस प्राधान्य दिले जाते त्या विचारास सुखवाद असे म्हणतात. अर्थात एखाद्या आचरणापासून दुःखद परिणामांची निर्मिती होत असेल तर असे आचरण अनैतिक समजून त्याचा त्याग केला पाहिजे. याउलट एखाद्या आचरणापासून सुखद परिणामांची निर्मिती होत असेल तर त्यास नैतिक किंवा इष्ट समजून त्याचा स्वीकार केला पाहिजे असे सुखवाद प्रतिपादन करतो. सुख हाच नैतिकतेचा अंतिम निकष आहे, सुखाच्या अनुषंगानेच व्यक्तीच्या आचरणाचे मूल्यमापन केले पाहिजे असे प्रतिपादन करणारी विचारसरणी म्हणजे नीतिशास्त्रीय सुखवाद होय.

सुखवादानुसार सुखाचा विचार केला पाहिजे. परंतु प्रश्न असा आहे की, स्वतःच्या सुखाचा विचार करावयाचा की सर्वांच्या सुखाचा विचार करावयाचा? जे मत स्वतःच्या सुखाला प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन करते, त्या मतास स्वसुखवाद किंवा स्वार्थ सुखवाद असे म्हणतात. तर जे मत स्वतःपेक्षा इतरांच्या किंवा सर्वांच्या सुखाला प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन करते त्यास पर सुखवाद किंवा परार्थ सुखवाद असे म्हणतात.

## स्वार्थ सुखवाद (Egoistic hedonism) :

स्वार्थ सुखवादास अहकेंद्री सुखवाद असेही म्हणतात. प्रत्येकाने स्वतःच्या सुखाला प्राधान्य दिले पाहिजे व प्रत्येकाने स्वतःसाठी जास्तीत जास्त सुख संपादन करावे असे, स्वार्थ सुखवाद प्रतिपादन करतो. प्राचीन सिरेनायसिज्म (Cirenaicism), चार्वाकाचा सुखवाद किंवा एपिक्युरस (Epicurus) चा सुखवाद [illegible] याच मताचा पुरस्कार करतात. आधुनिक काळातील या मताचे पुरस्कर्ते [illegible] हॉब्ज, गॅसेन्डी, स्पिनोझा व सिज्विक हे सांगता [illegible]

भारतीय तत्त्वज्ञानातील चार्वाक दर्शन स्वार्थ सुखवादाचा पुरस्कार करते. [illegible] नीतिशास्त्र सुखवादी आहे. चार्वाकांना प्रत्येक व्यक्तीचे आसक्ती [illegible]

सुख' हा विचार अधिक प्रभावी वाटतो.

चार्वाकांच्या मते ज्याला आपण निर्भेळ सुख म्हणू शकू असे सुख व्यक्तीच्या आयुष्यात क्वचितच निर्माण होऊ शकते. वास्तवात प्रत्येक सुखासोबत दुःखही असतेच, दुःख आहे म्हणून आपण सुखाकडे पाठ फिरवणे योग्य नाही. शिवाय भविष्यात सुख मिळेल या अपेक्षेने वर्तमान सुख नाकारणे हे देखील मूर्खपणाचे लक्षण आहे. ज्याप्रमाणे शहाणा मनुष्य नारळावरची करवंटी काढून आतील खोबर घेतो, साळीवरील तूस काढून आतील तांदूळ घेतो किंवा काटे बाजुला करून मासा खातो, त्याप्रमाणे आपल्या आयुष्यातील दुःखाला अलगदपणे बाजुला सारून त्यातील सुखाचा उपभोग घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

'यावज्जीवेत सुखं जीवेत् | ऋणं कृत्वा घृतं पिवेत् |
भस्मीभूतस्य देहस्य | पुनरागमनं कुतः |'

मानवी जीवन हे परत परत मिळणारे नसते. शिवाय एकदा जर या देहाची राख झाली की, स्वर्ग-नरक, पुर्नजन्म काहीही नसते. म्हणून जोपर्यंत हे जीवन लाभले आहे तोपर्यंतच आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण आपण सुखाने जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. किंवा याच जीवनात जास्तीत जास्त सुख कसे मिळेल याचाच आपण विचार केला पाहिजे. वेळप्रसंगी कर्ज काढावे लागले तरी हरकत नाही पण आपण तूप पिले पाहिजे असे ते लाक्षणिक अर्थाने सुचवतात. या जगात मीच ईश्वर आहे, मीच उपभोग घेणारा, मीच बलाढ्य व सुखी आहे. म्हणुन याच जीवनात सुखाची वृद्धी करणे हे आपले परम कर्तव्य आहे.

चार्वाकांचा हा विचार इतर दर्शनांना रूचला नाही. त्यांनी या विचारावर टीका केली. 'चार्वाक स्वार्थी विचार करतात व स्वार्थी विचार नैतिक असत नाही. शिवाय चार्वाक कोणत्याही मार्गाने सुख मिळवण्यास सांगतात. जे की नीतिबाह्य आहे.' अशा स्वरूपांची ती टीका होती.



परंतु चार्वाकांनी आपल्या विचारात अत्यंत टोकाचा स्वार्थ सांगितला नाही. प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या सुखाचा विचार करू लागली तर आपोआपच सर्व समाज सुखी होईल अशी त्यांची धारणा होती. शिवाय चार्वाकांनी वाटेल त्या मार्गाने सुख मिळवा असे कधीच सांगितले नाही. उलट जे समाजमान्य मार्ग आहेत. उदा. शेती, पशुपालन, व्यापार, शासकीय नोकरी अशा मार्गांचा अवलंब करून जास्तीत जास्त सुख उपभोगण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे चार्वाकांचे स्पष्ट मत आहे.

टीकात्मक विवेचन :

१) चार्वाक दर्शन केवळ ऐहिक अथवा इंद्रिय सुखालाच प्राधान्य देते. म्हणजेच हा विचार केवळ व्यावहारिक स्वरूपाचा आहे. नैतिकता केवळ व्यवहाराचा विचार करत नाही.

२) ऐहिक सुखापेक्षा वेगळे ध्येय म्हणजे आत्मिक उन्नतीचे ध्येय ही विचारसरणी विचारात घेत नाही. आत्मिक उन्नती हे मानवाचे वैशिष्ट्य आहे. त्याचाच जर विचार नसेल तर मानव आणि पशूत कसलाच भेद राहणार नाही.

परार्थ सुखवाद (Altruistic hedonism) :

'अधिकांश लोकांचे अधिकांश सुख' (Greatest happiness of the greatest number) हाच नैतिकतेचा निकष होय असे प्रतिपादन करणाऱ्या विचारसरणीस परार्थसुखवाद असे म्हणतात. परार्थ सुखवादानुसार ज्या कृतीमुळे अधिकांश लोकांचे अधिकांश सुख साधले जाईल अशीच कृती नैतिक समजून तिचा स्वीकार केला पाहिजे. या विचारात कृतीचा परिणाम किंवा कृतीची उपयुक्तता विचारात घेतली जाते म्हणून त्यास उपयुक्ततावाद असेही म्हणतात.

उपयुक्ततावादात प्रामुख्याने तीन महत्त्वाचे प्रश्न विचारात घेतले जातात. कोणत्या कृतीस योग्य म्हणता येते ? कृतीचे कोणते परिणाम नैतिकदृष्ट्या मौल्यवान

आहेत ? नैतिक मूल्यमापन करण्याचा निकष कोणता ? हेच ते प्रश्न होत. मॅकेन्झी, मूरहेड, शाफ्ट्सबरी, बटलर सिज्वीक, बेन्थॅम, मिल यांनी या मताचे समर्थन केले. या ठिकाणी आपण केवळ बेन्थॅम आणि मिल यांचा सुखवादी विचार पहाणार आहोत.

## १) जेरेमी बेन्थॅम (Jeremy Bentham) :

बेन्थॅम परार्थसुखवादी विचारवंत असला तरी तो आपल्या विचारात स्वार्थ सुखवादाकडे झुकलेला दिसून येतो म्हणून त्याच्या विचारास स्वार्थाधिष्ठित परार्थसुखवाद असे म्हणतात.

बेन्थॅम आपल्या सुखवादाचे विवेचन करताना असे प्रतिपादन करतो की, मानवी मनाचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, प्रत्येक व्यक्तींच्या ठिकाणी स्वप्रेम (Self-Love) आणि परप्रेम (Benevolence) अशा दोन सहजप्रवृत्ती दिसून येतात. स्वप्रेम म्हणजे स्वतःबद्दल वाटणारी आपुलकी, सहानुभूती किंवा दयेची भावना. तर परप्रेम म्हणजे इतरांविषयी वाटणारी आपुलकी, सहानुभूती किंवा दयेची भावना. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर प्रत्येक व्यक्तींची स्वप्रेमाची भावना अधिक प्रबळ असते. तुलनेने परप्रेमाची भावना दुबळी असते. याचे कारण जेव्हा संघर्षाचा प्रश्न निर्माण होतो किंवा एखादी निर्णायक अवस्था जेव्हा निर्माण होते तेव्हा व्यक्तीला स्वप्रेमच अधिक महत्त्वाचे वाटते. याचा अर्थ असा की, व्यक्ती मूलतः स्वार्थीच असते. तरीदेखील व्यक्ती परप्रेमासाठी झटते असे बेन्थॅमचे प्रतिपादन आहे.

मग असा प्रश्न निर्माण होतो की व्यक्ती मूलतः स्वार्थी असूनही परार्थासाठी का झटते ? यावर बेन्थॅमचे असे उत्तर आहे की, चार प्रकारच्या नीतिप्रेरकांमुळे व्यक्ती स्वार्थी असूनही परहितासाठी झटते. नैसर्गिक (निसर्ग नियम), सामाजिक (समाजाचे नियम), राजकीय (राज्याचे नियम) व धार्मिक (धर्माचे नियम) ही ती चार नीतिप्रेरके होत. या नीतिप्रेरकांकडे बक्षिस आणि शिक्षा अशा दोन प्रकारच्या शक्ती असतात. व्यक्तीने या प्रेरकांच्या नियमांचे पालन केले तर ही नीतिप्रेरके बक्षीस देतात. अन्यथा या नियमांचे उल्लंघन केल्यास शिक्षा करतात. मनुष्याचा स्वभावच असा आहे की त्याला बक्षिस प्रिय असते तर शिक्षा अप्रिय असते. म्हणून बक्षिसाच्या अपेक्षेने किंवा शिक्षेच्या भीतिपोटी व्यक्ती स्वार्थी असूनही परहितासाठी झटते. बेन्थॅमच्या मते ही नीतिप्रेरके व्यक्तीला स्वार्थापासून परावृत्त करतात आणि परहितासाठी प्रवृत्त करतात.

### दोन सुखात परिणामात्मक भेद असतो :

'अधिकांश लोकांचे अधिकांश सुख' ही व्याख्या बेन्थॅमने मान्य केली आहे. तरीपण 'अधिकांश सुख' या शब्दाने त्याला 'परिमाणात्मक (Quantitatively) जास्त' सुख अभिप्रेत आहे. जेव्हा एकापेक्षा अधिक सुखे आपल्यासमोर असतात तेव्हा त्यापैकी कोणत्या सुखाला महत्त्व द्यायचे हा खरा प्रश्न आहे. उदा. एखादा खेळ खेळून मिळणारे सुख, कादंबरी वाचनातून मिळणारे सुख किंवा भोजन केल्याने मिळणारे सुख ही तिन्ही सुखे एकदमच आपल्यासमोर उभी राहिली तर कोणत्या सुखाचा स्वीकार करायचा ? यावर बेन्थॅमचे असे प्रतिपादन आहे की, दोन सुखात गुणात्मक दृष्ट्या कसलाच भेद नसतो. सर्व सुखे गुणात्मकदृष्ट्या सारखीच असतात. परंतु कोणत्याही दोन सुखात परिमाणाचा किंवा मोजमापाचा भेद असतो. ज्या सुखाचे परिमाण अधिक असते, अशाच सुखाचा स्वीकार केला पाहिजे. ज्याप्रमाणे आपण एखाद्या खोलीचा आकार लांबी, रुंदी, उंची या परिमाणांच्या सहाय्याने ठरवतो त्याप्रमाणे एखाद्या कृतीतून निर्माण होणाऱ्या सुखाचे परिमाण आपल्याला काही तत्त्वांच्या आधारे ठरवता येते. त्यालाच बेन्थॅम सुखाची मोजमापे (Pleasure Calculus) असे म्हणतो. ही मोजमापे पुढीलप्रमाणे होत.

अ) तीव्रता (Intensity) : दोन सुखांपैकी सुख आपल्याला अधिक तीव्रतेने जाणवते त्या सुखाचे परिमाण अधिक असते. असे सुख ज्या कृतीतून निर्माण ह

तीव्र कृती नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजावी. अर्थात ही तीव्रता संदर्भानुसार बदलणारी असू शकते. उदा. अन्न सेवनातून मिळणारे सुख हे कादंबरी वाचनातून मिळणाऱ्या सुखापेक्षा तीव्र वाटत असेल तर अन्न सेवन नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजावे.

ब) कालावधी (Duration) : दोन सुखांपैकी जे सुख अधिक काळ टिकणारे असते ते सुख श्रेष्ठ समजावे. याचाच अर्थ अल्पकाळ टिकणाऱ्या सुखापेक्षा दीर्घकाळ टिकणारे सुख नैतिकदृष्ट्या इष्ट असते. उदा. शारीरिक सुख भोगल्याक्षणी संपणारे असते तर मानसिक सुख हे अधिक काळ अनुभवता येते म्हणून मानसिक सुख श्रेष्ठ असते.

क) फलद्रुपता (Fruitfulness) : काही सुखे ही निव्वळ सुखे असतात. त्यांच्यापासून काहीही नवनिर्मिती होत नाही. परंतु काही सुखे अशी असतात की, जी स्वतःपासून इतर सुखाची निर्मिती करतात. अशा सुखानाच श्रेष्ठ समजावे.

ड) निश्चितता (Certainity) : अनिश्चत सुखापेक्षा जे सुख निश्चित असते तेच श्रेष्ठ समजले पाहिजे. भूक लागल्यावर काही वेळाने मिळणाऱ्या अनिश्चित पंचपक्वान्नापेक्षा हातात असलेली निश्चित शिळी भाकरी देखील श्रेष्ठ असते.

इ) शुद्धता (Purity) : ज्या सुखाच्या अनुभवासोबत दुःखाचा लवलेश नसतो असे निर्मळ सुख दुःखमिश्रित सुखापेक्षा अधिक परिमाणकारक असते. उदा. गुलामीतील पोटभर भोजनापेक्षा स्वातंत्र्यातील अर्धी भाकरी श्रेष्ठ असते.

फ) निकटता (Nearness) : दुरस्थ सुखापेक्षा समीप असणारे सुख परिमाणदृष्ट्या श्रेष्ठ असते. म्हणूनच असे म्हणतात की, हातचे सोडून पळत्याच्या मागे लागू नये.

ग) व्यापकता (Extensity) : दोन सुखांपैको ज्या सुखाचा परिणाम जास्तीत जास्त लोकांवर होतो, त्या सुखाचे मोजमाप अधिक असते. असे सुख ज्या कृतीतून [illegible] नैतिक समजावी. उपयुक्ततावादी विचार प्रामुख्याने याच तत्त्वावर



आधारित आहे.

वर प्रतिपादन केलेली सात सुखाची मोजमापे बेन्थेम सांगतो व कोणत्या सुखाची निवड करावी याचे मार्गदर्शन करतो. परंतु प्रश्न असा आहे दोन सुखे कमी-जास्त असतील तर वरील तत्त्वांच्या आधारे आपण निवड करू शकतो. पण जेव्हा दोन्ही सुखांचे परिणाम सारखेच असेल तर कोणते सुख इष्ट समजावे? याला बेन्थेमचे असे उत्तर आहे की, अशा वेळी त्याच्यात कोणताही भेद असला तरी ती दोन्ही सुखे सारख्याच नैतिक दर्जाची समजावीत.

टीकात्मक विवेचन :

१) बेन्थेम आपल्या सुखवादाचे समर्थन करताना असे प्रतिपादन करतो की, 'व्यक्ती स्वार्थी असूनही परार्थासाठी झटतो. याचे कारण म्हणजे नीतिप्रेरके होय.' परंतु त्याची चारही नीतिप्रेरके नैतिकदृष्ट्या योग्य नाहीत. ही नीतिप्रेरके व्यक्तीचे संकल्प स्वातंत्र्य हिरावून घेतात. बाह्य दडपणाखालील कृतीचे नैतिक मूल्यमापन शक्य नसते.

२) बेन्थेमने सांगितलेली मोजमापाची एकके कुचकामी स्वरूपाची आहेत. कारण सुख-दुःख या मानसिक घटना आहेत. त्या एकाच प्रक्रियेच्या दोन अवस्था आहेत. दुःख नेमके कुठे संपते व सुख कुठे सुरू होते याची सीमारेषा सांगता येत नाही. शिवाय व्यक्ती क्षणात सुखी असते तर क्षणात दुःखी होते. त्यामुळे सुखाचे मोजमाप करता येत नाही.

२) जे.एस. मिल (J.S. Mill) :

( बेन्थेमच्या तुलनेत मिल हा अधिक शुद्ध उपयुक्ततावादी होता. आपल्या नीतिशास्त्रीय विचारांच्या समर्थनासाठी तो दोन युक्तीवाद देतो. पहिल्या युक्तीवादात तो सुखवादाचे तर दुसऱ्या युक्तीवादात उपयुक्ततावादाचे स्पष्टीकरण देतो. त्याचे

स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येते.

अ) प्रत्येक व्यक्ती सुखाची इच्छा का करते ? किंवा प्रत्येक व्यक्तीस सुख इष्ट का वाटते ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी मिल पुढील युक्तीवाद देतो.

१. जे पाहिले जाते ते पाहण्यायोग्य असते.
२. जे ऐकले जाते ते ऐकण्यायोग्य असते.
३. जे इच्छिले जाते ते इच्छिण्यायोग्य असते.
४. सर्व व्यक्ती सुखाची इच्छा करतात.
कारण सुख इच्छिण्यायोग्य असते.

ब) प्रत्येक व्यक्ती सर्वांच्या सुखाची इच्छा का करते किंवा प्रत्येक व्यक्तीस सर्वांचे सुख इष्ट का वाटते ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी मिल दुसरा युक्तीवाद देतो.

१. प्रत्येक व्यक्तीचे सुख त्या व्यक्तीस इष्ट असते.
२. सर्वांचे सुख त्या व्यक्तीसमुहास इष्ट असते.
∴ प्रत्येक व्यक्तीस सर्वांचे सुख इष्ट असते.

या पार्श्वभूमीवर मिल आपला विचार स्पष्ट करतो.

**दोन सुखात गुणात्मक भेद असतो :**

मिलच्या मते बेन्थेम प्रतिपादन करतो तसा दोन सुखात परिमाणात्मक भेद असतो. परंतु त्याहीपेक्षा दोन सुखात गुणात्मक (Qualitative) भेद असतो. म्हणून बेन्थमच्या 'दोन सुखात गुणात्मक भेद नसतो.' या मताशी मिल असहमत आहे.

या संदर्भात असा प्रश्न निर्माण होतो की जर दोन सुखात गुणात्मक भेद असेल तर तो ठरविण्याचा निकष कोणता? मिलच्या मते ज्या प्रामाणिक व्यक्तींने शारीरिक व मानसिक अशा दोन्ही सुखांचा अनुभव कोणत्याही बाह्य दडपणाशिवाय घेतला आहे अशा प्रामाणिक व्यक्तींचे मत ही त्याची कसोटी समजावी. जेव्हा अशा व्यक्तींची संख्या अधिक असेल तेव्हा त्यांच्या बहुमताचा कल हा निकष मानावा. या संदर्भात मिलचा असा विश्वास आहे की, सर्वसामान्य प्रामाणिक व्यक्ती शारीरिक सुखापेक्षा बौद्धिक सुख गुणात्मकदृष्ट्या श्रेष्ठ असते, या बाजुनेच मत देईल.

**शारीरिक सुखापेक्षा मानसिक सुख गुणात्मकदृष्ट्या श्रेष्ठ असते :**

मिलच्या मते सर्वसामान्य प्रामाणिक व्यक्ती बौद्धिक सुख हे शुद्ध, सात्विक किंवा गुणात्मक श्रेष्ठ मानतो, केवळ एवढ्याच कारणास्तव आपण ते स्वीकारले पाहिजे का ? यास मिलचे असे उत्तर आहे की, सर्वसामान्य माणूस स्वतःला निम्नस्तरावर जीवन जगणाऱ्या प्राण्यापेक्षा श्रेष्ठ समजतो. कारण मानवाची बुद्धी इतर प्राण्यांच्या तुलनेत प्रगत असते. त्यामुळेच तो चांगले-वाईट, इष्ट-अनिष्ट असा विवेक करू शकतो. काही व्यक्ती पशुपातळीचे जीवन जगत असतीलही. परंतु अशांची संख्या बोटावर मोजण्याएवढीच असते. म्हणून प्रत्येक विवेकी व्यक्ती शारीरिक सुखापेक्षा बौद्धिक सुख गुणातमक दृष्ट्या श्रेष्ठ मानतो. म्हणून आपण हे असे मानतो की, 'संतुष्ट डुकरापेक्षा असंतुष्ट सॉक्रेटिस बरा.' किंवा 'संतुष्ट मूर्खापेक्षा असंतुष्ट बुद्धीमान बरा.' दीर्घकाल अविरत संशोधन करून एखाद्या शास्त्रज्ञास मिळणारे सुख हे निश्चितपणे दारूड्याला दारू पिऊन मिळणाऱ्या सुखापेक्षा गुणात्मक श्रेष्ठ असते. सारांश, दोन सुखात परिमाणात्मक भेद असतो हे प्रतिपादन करण्यासाठी बेन्थेमने सांगितलेल्या सात एककामध्ये 'गुण' या एककाची भर मिलने घेतली.

**व्यक्ती आंतरिक प्रेरकामुळे परहितासाठी झटते :**

व्यक्ती स्वार्थी असूनही परहितासाठी का झटते ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी बेन्थमने नैसर्गिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक अशी चार नीतिप्रेरके सांगितली आहेत. परंतु काही नीतिप्रेरके बाह्य स्वरूपी असल्याने व्यक्तीस खऱ्या अर्थाने नैतिक बनवू शकत नाहीत. कारण बाह्य दडपणाखाली झालेल्या कृतीचे नैतिक समर्थन

करता येत नाही. म्हणून मिलच्या मते खरा नीतिप्रेरक आंतरिक असतो. 'जोपर्यंत एखादी कृती अंतःप्रेरणने होणार नसेल तोपर्यंत तिचे समाधानही व्यक्तीला मिळणार नाही. म्हणून खरा नीतिप्रेरक आंतरिक असतो.' असे प्रतिपादन करून मिल 'आंतरिक' नीतिप्रेरकाची भर घालतो व आपला उपयुक्ततावाद अधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

**टीकात्मक विवेचन :**

१) मिल ने सांगितलेल्या पहिल्या युक्तीवादात 'शब्दसाम्यमूलक' तर्कदोष घडला आहे. कारण जे इच्छिले जाते ते इच्छिण्या योग्य असते' हे बरोबर आहे काय? इच्छिलेल्या सर्वच गोष्टी इष्ट असतात का ? आपण वाईट गोष्टीची इच्छा केली तर ती इच्छिण्या योग्य असते का ? अर्थातच नाही म्हणून मिलचे हे मत योग्य वाटत नाही.

२) मिलच्या दुसऱ्या युक्तीवादात 'समुहभास' व 'एकैकाभास' असे तर्कदोष निर्माण झाले आहेत. 'जे एकाच्या संदर्भात आहे ते सर्वांच्या संदर्भात असते.' असे मानल्याने समुहभास निर्माण होतो. प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या घराचे दार उघडण्याचा हक्क आहे म्हणून सर्वानाच सर्वांच्या घराचे दार उघडण्याचा हक्क आहे, असा निष्कर्ष समुहाभास निर्माण करतो. प्रत्येकास स्वतःचे सुख इष्ट असते म्हणून सर्वांना सर्वांचे सुख इष्ट असते असे म्हणता येत नाही. दुसरे असे की 'जे सर्वांच्या संदर्भात आहे ते प्रत्येकाच्या संदर्भात असते' असे मानल्याने एकैकाभास निर्माण होतो. सर्व भारतीय सैन्य शौर्याने लढले म्हणून प्रत्येक सैनिक शौर्याने लढला असा निष्कर्ष एकैकाभास निर्माण करतो. सर्वांना सर्वांना सुख इष्ट असते म्हणून प्रत्येकास सर्वांचे सुख इष्ट असते असे म्हणता येत नाही.

३) मिलचा आंतरिक प्रेरकच त्याचा उपयुक्ततावाद फोल ठरतो. कारण व्यक्ती परहितासाठी का झटते तर 'आंतरिक प्रेरकामुळे' असे मिलचे प्रतिपादन आहे. आंतरिक प्रेरकाच्या निर्देशानुसारच का वागावे ? तर तसे वागल्याने मला आनंद, समाधान मिळते असे म्हणताना तो प्रत्यक्षात स्वार्थ सुखवादाचाच पुरस्कार करतो. )

०००



४.

# कर्तव्यवादी नीतिशास्त्र

# (Deontological Ethics)

तिसऱ्या प्रकरणात सुखवादी विचारसरणीचे व त्यातील काही प्रकारांचे थोडक्यात स्वरूप पाहिले. नैतिकतेचा एक निकष म्हणून सुखवादाकडे पाहिले जाते. सुखवादानुसार व्यक्तीच्या आचरणाचे परिणाम पाहून आचरणाचे मूल्यमापन केले जाते किंवा सुख हाच नैतिकतेचा अंतिम निकष आहे. परंतु हा विचार एकांगी स्वरूपाचा आहे. केवळ सुखाची प्राप्ती करणे हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट ठरू शकत नाही. मानवाचे इतर प्राण्यांपेक्षा वेगळेपण त्याच्या विवेकबुद्धीत आहे. म्हणून 'आपली सत्संकल्परूपी बुद्धी आपल्याला जे आदेश देते त्या आदेशानुसार वागण्यातच आत्मकल्याण सामावलेले आहे' असा विचार पुढे आला. त्याचाच एक भाग म्हणून कर्तव्यवादी विचारसरणी निर्माण झाली.

'व्यक्तीच्या कृतीची नैतिकता ही त्या कृतीच्या परिणामांवर अवलंबून न राहता ती त्या कृतीचाच अंगभूत गुण असतो.' असे प्रतिपादन करणाऱ्या विचारसरणीस कर्तव्यवाद असे म्हणतात. कर्तव्यवादात 'विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट कृती सदैव युक्त असते. मग त्याचे परिणाम काहीही होवोत,' असा विचार अभिप्रेत असतो. कर्तव्यवादी नीतिशास्त्रानुसार 'मी एखादी कृती का करावी ?' या प्रश्नाचे उत्तर 'त्यामुळे एखादे साध्य साधता येईल' असे नसून 'ती कृती करणे माझे कर्तव्य आहे.' अशा स्वरूपाचे असते. कोणतीही कृती करीत असताना ती केवळ 'कर्तव्यासाठी कर्तव्य (Duty for the sake of duty) या भावनेतून पार पाडली पाहिजे, असे कर्तव्यवाद प्रतिपादन करतो.

कर्तव्यवादी विचार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. त्यावर अनेकांनी आपली मतेही सांगितली आहेत, परंतु आपल्याला भारतीय कर्तव्यवाद म्हणून गीतेतील निष्काम कर्मयोग व पाश्चात्य कर्तव्यवाद म्हणून कांटचा विचार प्रातिनिधिक स्वरूपात पहावयाचा आहे.

## १) गीता : निष्काम कर्मयोग (The Gita : Nishkam Karma Yoga) :

भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान हा सर्वच भारतीयांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. गीतेच्या निर्मितीचा काल संशोधकांच्या मते इ.स. पूर्व ६०० ते इ.स.पूर्व २०० या दरम्यान असावा. तत्कालीन समाजजीवनाचे समग्र दर्शन गीतेतून प्रतिबिंबीत होते.

गीतेचे प्रतिपादन हे प्रामुख्याने वाङ्मयीन चौकटीत झालेले आढळते. कुरूक्षेत्रावर कौरव आणि पांडव यांचे विशाल सैन्य समोरासमोर उभे असताना, अर्जुनापुढे प्रश्न उपस्थित झाला की, 'आपण लढावे की लढू नये ?' कारण लढावे तर शत्रुपक्षातील गुरूजन, मित्र, आप्त यांची हत्या केल्याचे पातक लागेल. न लढावे तर क्षत्रीय धर्माचे पालन न केल्याचे पातक लागेल. तेव्हा काय करावे ? असे धर्मसंकट त्याच्या समोर होते. त्यावेळी श्रीकृष्णाने जो उपदेश करून अर्जुनास लढाईस प्रवृत्त केले त्यालाच 'भगवद्गीता' असे म्हणतात.

तत्कालीन समाजात विविध तत्त्वज्ञाने अस्तित्वात होती त्या सर्वांचा समन्वय गीतेत पहावयास मिळतो. गीतेत विविध विषयांचा उहापोह पहावयास मिळत असला तरी आपल्याला केवळ गीतेचा कर्तव्यवाद अर्थात निष्काम कर्मयोग पहावयाचा आहे.

'मानवी जीवन दुःखमय असून या अशा जीवनातून सुटका करून घेणे म्हणजेच मोक्षाप्रद जाणे हे मानवी जीवनाचे अंतिम साध्य आहे.' ही विचारांची चौकट जवळपास सर्वच भारतीय दर्शनात थोड्याफार फरकाने पहावयास मिळते.



मानव सतत स्वतःच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या इच्छांची पूर्तता करण्याची अविरत धडपड करतो, सुख मिळवण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याच्या असे लक्षात येते की, आपण ज्याला सुख समजतो ते तात्कालिक आहे. शिवाय असे सुख आपल्यासोबत दुःख घेऊन येत असते. म्हणून माणसाची धडपड एका चिरंतन शाश्वत सुखासाठी असते. असे सुख मोक्षाच्याच अवस्थेत मिळते. म्हणून मोक्ष हे अंतिम ध्येय आहे असे जवळपास सर्वच दर्शने सांगतात.

गीतेच्या अनुसार अंतिम ध्येयाची जाणीव सर्वांनाच असते. परंतु या ध्येयाप्रत जाण्याचा मार्ग त्यांना माहिती नसतो. विविध विचारसरणींनी हा मार्ग सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आत्मसाक्षात्कारातून मोक्षाकडे जाता येत असे ज्ञानमार्ग सांगतो. ईश्वराला शरण जाऊन, त्याच्या भक्तीत तल्लीन होऊन मोक्षानुभूती येऊ शकते असे भक्तीमार्ग सांगतो. सर्व कर्मांचा त्याग करून चित्त आत्म्याच्या ठिकाणी एकाग्र करावे असे ध्यानमार्गाचे प्रतिपादन आहे. तर वेदप्रणित यज्ञयागादि कर्मकांड करून मोक्षाप्रद जाता येते असाही एक विचार रूढ होता. अशा सर्व विचारांचा समन्वय गीतेत आढळतो.

गीतेच्या तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक व्यक्ती जन्माला येताना काही विशिष्ट संस्कार घेऊन जन्माला येत असते. त्यामुळे बालपणी कोणतेही संस्कार नसताना काही विशिष्ट गुण प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी दिसतात. त्यानुसार व्यक्तीचे जे आचरण घडते त्यास त्या व्यक्तीचा स्वभाव असे म्हणतात. या स्वभावानुसार व्यक्ती आपल्या जीवनात जे आचरण करते त्यानुसार तिला समाजात एक विशिष्ट स्थान किंवा दर्जा प्राप्त होत असतो. एकदा जर हे स्थान किंवा दर्जा प्राप्त झाला की, त्या व्यक्तीची आपोआपच काही सामाजिक कर्तव्ये ठरतात. अशा कर्तव्यानाच 'स्वधर्म' असे म्हटले जाते. पाश्चात्य विचारवंत ब्रॅडले याचा 'माझे स्थान आणि त्या प्रती कर्तव्ये' (My station and its duties) हा विचार जवळपास असाच आहे.

गीतेत मनुष्याच्या गुणकर्मावरून किंवा स्वभावावरून मनुष्यप्राण्याचे चार

वर्ग मान्य केले आहेत. त्यांनाच वर्ण असे म्हणतात. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र असे ते चार वर्ण होत. या प्रत्येक वर्णाचे एक विशिष्ट कर्तव्य ठरले आहे. त्यालाच त्या वर्णाचा स्वधर्म असे म्हणतात. अध्ययन-अध्यापन करणे हा ब्राम्हणाचा, समाजाचे संरक्षण करणे हा क्षत्रियांचा, समाजाच्या भौतिक गरजा भागवणे हा वैश्याचा तर तिन्ही वर्णांची सेवा करणे हा शुद्राचा स्वधर्म मानला गेला. याच बरोबर व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाचे ही चार भाग करण्यात आले. त्या प्रत्येक भागास आश्रम असे नाव आहे. ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास असे ते चार आश्रम होत. या प्रत्येक आश्रमानुसारही काही कर्तव्ये आहेत. या कर्तव्यांना देखील स्वधर्म असे म्हणतात.

गीतेच्या मते स्वभावानुसार कर्म करणे किंवा स्वधर्मानुसार जीवन जगणे हे प्रत्येक व्यक्तीचे नैतिक कर्तव्य ठरते. परंतु हे कर्तव्य पार पाडत असताना किंवा स्वधर्मानुसार आचरण करत असताना, त्यापासून मिळणाऱ्या फळाची आसक्ती ठेवता कामा नये. आपल्याला अमुक एखादे कर्तव्य प्रामाणिकपणे करावयाचे आहे. अशा कर्तव्यभावनेपेक्षा निराळा हेतू त्यामागे असता कामा नये. आपल्या आचरणाचे चांगले परिणाम होतील की वाईट परिणाम होतील असा परिणामवादी विचारही त्यामागे असता कामा नये.

एखादा हेतू मनामध्ये ठेवून किंवा परिणामांचा विचार करून केलेल्या कर्मापासून दुःखाचीच निर्मिती होते. म्हणून स्वधर्मानुसार कर्म करणे एवढाच आपला अधिकार आहे. त्या कर्मापासून मिळणाऱ्या फळावर आपला कसलाच अधिकार नाही. म्हणून फळाची आसक्ती न ठेवता प्रत्येकाने स्वभावनीयत कर्म करीत राहिले पाहिजे. अशा कर्मास 'निष्काम कर्म' असे म्हणतात. अशा प्रकारचे कर्म करा म्हणून सांगितल्या जाणाऱ्या मार्गास गीतेत कर्ममार्ग किंवा कर्मयोग असे म्हणतात. यालाच लोकमान्य टिळक 'निष्काम कर्मयोग' असे म्हणतात. तर महात्मा गांधी 'अनासक्ती योग' असे म्हणतात.

मानवी जीवनात जे दुःख निर्माण होते, त्यास प्रत्यक्ष कर्म कारणीभूत नसते.



तर कर्मफलाची जी आसक्ती असते ती कारणीभूत ठरते. ही आसक्ती प्रत्येकाने सोडली पाहिजे. या कर्मयोगाच्या सहाय्याने मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षापर्यंत जाता येते असे गीतेचे प्रतिपादन आहे.

## २) कांट : निरपेक्ष आदेश (Kant : Categorical Imperatives) :

कांट हा बुद्धीवादी तत्त्वज्ञ आहे. सुखवादी विचाराची विरोधी भुमिका बुद्धीवादाची आहे. कारण भावना व बुद्धी या दोन आत्म्याच्या घटकांपैकी सुखवाद हा भावनेला प्राधान्य देतो. परंतु त्यामुळे दुसरा घटक 'बुद्धी' हा उपेक्षित राहतो. वास्तविक बुद्धी हाच घटक मानवाचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. हाच घटक मानवाला इतर प्राण्यापेक्षा वेगळा ठरतो. म्हणून 'बुद्धीच्या आदेशाप्रमाणे वागण्यातच व्यक्तीचे आत्मकल्याण सामावलेले आहे' असे बुद्धीवादाचे प्रतिपादन आहे.

व्यक्तीच्या आत्म्याचे घटक असणाऱ्या भावना व बुद्धी यात सतत संघर्ष चालू असतो. या संघर्षात बहुतांशीवेळा भावनेचाच विजय होत असतो. कारण भावनेनुसार व्यक्तीला त्वरीत सुख मिळते. तरीपण असे सुख त्वरीत नष्ट होणारे असल्याने व्यक्तीने भावनेच्या आदेशाप्रमाणे न वागता सत्संकल्परूपी बुद्धीच्या आदेशाप्रमाणे वागावे असे कांटचे प्रतिपादन आहे. तेच प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. आपली सत्संकल्परूपी बुद्धी (Good will) आपल्याला जे आदेश देते, त्या आदेशास कांट निरपेक्ष आदेश असे म्हणतो. कर्तव्यासाठी कर्तव्य असे त्या आदेशांचे स्वरूप आहे.

सामान्यतः आदेश दोन प्रकारचे असतात -

१) सापेक्ष आदेश - ज्या आदेशास जर तरची उपाधी असते किंवा जे आदेश स्थल काल परिस्थितीनुसार बदलत असतात त्यांना सापेक्ष आदेश असे म्हणतात. जर अमुक केले तर अमुक होईल असे आदेशाचे स्वरूप असते. उदा.

राजकीय नियम.

२) निरपेक्ष आदेश - ज्या आदेशात जर तरची उपाधी नसते किंवा जे आदेश स्थल काल परिस्थितीनुसार बदलणारे नसतात, उलट सर्व व्यक्तींनी कुठेही, कोणत्याही काळात व कोणत्याही परिस्थितीत त्यांचे पालन करणे अनिवार्य ठरते असे आदेश निरपेक्ष स्वरूपाचे असतात. कांटच्या मते, 'एखादा नियम सर्वच व्यक्तींना लागू पडतो असे वाटत असेल तरच त्या नियमानुसार वागले पाहिजे.' अशा नियमालाच कांट निरपेक्ष आदेश असे म्हणतो.

**निरपेक्ष आदेशांचे प्रकार (Kinds of Categorical Imperatives) :**

कांटच्या मते निरपेक्ष आदेशाचे चार प्रकार असून ते सार्वकालिक व सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत.

१) "एखादे तत्त्व सर्वसामान्य झाले तरी, ज्या तत्त्वापासून विसंगती निर्माण होणार नाही अशा तत्त्वानुसार वागा."- (Act only on that principal which you can at the same time will, without a fear of contradiction to be a universal law) या आदेशाचा अर्थ असा की, एखादे तत्त्व नियम म्हणून कधी स्वीकारले जाते ? तर जेव्हा एखाद्या तत्त्वाचे सामान्यीकरण झाले असेल. सर्वच व्यक्तींनी एखाद्या तत्त्वाला मान्यता दिली की तो नियम बनतो. परंतु एखाद्या तत्त्वाचे केवळ सामान्यीकरण होऊन चालत नाही, तर अशा तत्त्वानुसार जे आचरण घडते, त्यापासून कोणतीही विसंगती निर्माण होणार नाही हे ही पाहिले पाहिजे. एखाद्या तत्त्वाचे आपण सामान्यीकरण केले आणि त्याचा परिणाम हितावह झाला तर अशा तत्त्वास नैतिक तत्त्व समजून त्यानुसार आचरण केले पाहिजे. जर का अशा तत्त्वापासून विसंगती निर्माण होत असेल तर अशा तत्त्वास अनैतिक तत्त्व समजून त्याचा त्याग करावा असे कांटचे प्रतिपादन आहे. उदा. चोरी करा आणि सत्य बोला या तत्त्वाचे सामान्यीकरण करून ती आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणली तर यातील पहिल्या तत्त्वापासून समाजात विसंगती निर्माण होते. त्यामुळे ते अनैतिक ठरते. म्हणून अशा तत्त्वाचा त्याग केला पाहिजे. याऊलट 'सत्य बोला' या तत्त्वाचे सामान्यीकरण केल्यास त्याचा चांगला परिणाम होतो. कसलीच विसंगती



निर्माण होत नाही. म्हणून अशा तत्त्वानुसारच वागले पाहिजे असे कांट सूचित करतो.

२) "मानवतेला साधन न समजता साध्य समजून वागा."- (Act so as to treat humanity-whether in your own person or in that of another, never as a means only, but as an end withal)

या आदेशाचा अर्थ असा की, तुम्ही स्वतःला मानव समजत असाल तर इतरांनाही मानव समजणारे तुमचे वर्तन असले पाहिजे. समाजातील कोणत्याही व्यक्तीचा धर्म, वंश, जात, लिंग, आर्थिक परिस्थिती या भेदावर साधन म्हणून स्वतःच्या हितासाठी वापर करता कामा नये. वंशावर आधारीत केला जाणारा काळा-गोरा असा भेद, गुलामगिरी पद्धत, वेश्याव्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अशा गोष्टींचा कांट निषेध करतो. कारण अशा गोष्टींत आपण इतर व्यक्तींना आपल्या हिताचे साधन समजतो. दैनंदिन जीवनात आपली दृष्टी अशीच असते. रिक्षावाला, हमाल, मोलकरीण, मजूर यांना आपण माणूस न समजता आपल्या हिताचे, गरजपूर्तीचे साधन समजत असतो. कांटच्या मते प्रत्येक व्यक्ती स्वतःच स्वतःचे साध्य असते. तिचा आपल्याला साधन म्हणून वापर करता येणार नाही. एवढेच नाही तर व्यक्तीला स्वतःलाच स्वतःचा साधन म्हणून वापर करण्याचा नैतिक हक्क नाही. त्यामुळेच कांट आत्महत्या किंवा गैरव्यवहार करण्याचा प्रवृत्तीचा निषेध करतो. कारण आत्महत्या करणारी व्यक्ती स्वतःच्या फायद्यासाठी स्वतःच्या व्यक्तीत्त्वाचा वापर करीत असते. म्हणून कांटच्या मते कोणतीही व्यक्ती स्वतःला मानव समजत असेल तर तिने इतरांनाही तसेच समजून वागले पाहिजे. प्रत्येकास इतरांचा साधन म्हणून वापर तर करता येणार नाही, परंतु स्वतःस देखील साधन समजता येणार नाही.

३) "साध्याच्या साम्राज्याचे नागरिक म्हणून जीवन जगा."- (Act as a member of a kingdom of Ends)

या आदेशाद्वारे कांट असे प्रतिपादन करतो की, प्रत्येक व्यक्तीने साध्याच्या साम्राज्याचे नागरिक म्हणून जीवन जगले पाहिजे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, 'साध्याचे साम्राज्य' ही स्थलकालविशिष्ट मूर्त संकल्पना नाही. तर साध्याचे साम्राज्य म्हणजे बुद्धिनिष्ठ नैतिक माणसांचा असा समूह आहे की ज्यात संघर्ष, भेदभाव अशा गोष्टींना स्थान नसते. नैतिकतेच्या नियमांचे पालन करणाऱ्या व्यक्तींचा हा समूह असतो. या साम्राज्याची नागरिक असणारी प्रत्येक व्यक्ती एकाचवेळी दोन प्रकारच्या भूमिका पार पाडत असते. जेव्हा अशा व्यक्ती समाजाच्या हिताचे नैतिक नियम तयार करीत असतात तेव्हा त्या ईश्वराची किंवा राजाची भूमिका पार पाडत असतात. जेव्हा आपणच केलेले नियम इतर व्यक्ती ज्या आदरणीय भावनेतून पाळतात, त्याच भावनेतून आपण ही इतर व्यक्तींपैकीच एक आहोत. असे समजून स्वतःदेखील त्या नियमांचे प्रामाणिकपणे पालन करतात. तेव्हा या व्यक्ती प्रजेची भुमिकादेखील पार पाडत असतात. म्हणून कांटच्या मते प्रत्येक व्यक्तीने अशा साध्याच्या साम्राज्याचे नागरिक म्हणून जीवन जगले पाहिजे. कांटचा हा विचार महात्मा गांधींच्या 'विश्वस्तवृत्ती' (Trusteeship) शी मिळता-जुळता आहे. गांधीजींच्या मते ज्या व्यक्तीजवळ जी संपदा आहे तिच्यावर त्याचा हक्क असतोच, परंतु त्याने असेही समजले पाहिजे की माझ्या संपदेवर माझ्याएवढाच इतरांचाही समान हक्क आहे.'

४) "एखादा नियम मी स्वतःच स्वतःवर लादून घेतो, तेव्हाच तो नियम नैतिकदृष्ट्या माझ्यावर बंधनकारक असतो." (A Principal of moral conduct is morally hinding on me if and only if i regard it as a law which I impose on myself)

या शब्दात [illegible] की नैतिकता ही बाह्य परिस्थितीत सामावलेली नसते. नैतिक नियम व्यक्तींवर बाहेरून लादता येत नाहीत. नैतिकता ही आंतरिक स्वरूपाची असते. जेव्हा एखादा नियम माझ्यावर बाहेरून लादला जातो तेव्हा तो खऱ्या अर्थाने नैतिकदृष्ट्या माझ्यावर बंधनकारक नसतो. परंतु



आंतरिक प्रेरणेने, सारासार विचार करून, निरपेक्ष बुद्धीच्याद्वारे एखादा नियम मी जेव्हा स्वतःवर लादून घेतो, तेव्हाच तो नियम नैतिकदृष्ट्या माझ्यावर बंधनकारक ठरत असतो असे कांटचे प्रतिपादन आहे.

कांटच्या मते कर्तव्यासाठी कर्तव्य करणे किंवा निरपेक्ष आदेशांचे पालन करणे हाच सद्गुण आहे. सद्गुणच व्यक्तीजीवनातील 'परम शिवतत्त्व' (Supreme Good) आहे.

टीकात्मक विवेचन :

१) कांट भावनेला मानवाच्या आत्मकल्याणाच्या मार्गातील अडसर समजतो. त्यामुळे तिला नष्ट केले पाहिजे असे तो मानतो. परंतु भावना ही मानवी जीवनरूपी वाळवंटातील हिरवळ आहे. भावनेमुळे माणूस अधिक क्रियाशील बनतो. हे नाकारता येत नाही. शिवाय सर्वच भावना वाईट नसतात. कितीतरी भावना चांगल्या किंवा नैतिक असतात. याचा विचार कांटने केलेला दिसत नाही.

२) कांट आपल्या निरपेक्ष आदेशात अपवाद मान्य करत नाही. ज्या सामान्य तत्त्वापासून सामाजिक विसंगती निर्माण होत असेल, त्याचा त्याग केला पाहिजे असे त्याचे मत आहे. परंतु या निकषानुसार काही तत्त्वे अनैतिक ठरतात. उदा. ब्रम्हचर्याचे पालन करा. या तत्त्वाचे सामान्यीकरण केल्यास समाजाचे अस्तित्व धोक्यात येते. म्हणून त्यास अनैतिक मानायचे का असा प्रश्न निर्माण होतो.

❁❁❁

५.

# शिक्षाविषयक उपपत्ती

# (Theories of Punishment)

नीतिशास्त्रात चांगले, इष्ट, शुभ, नैतिक, सद्गुण अशाच संकल्पनांचा विचार होतो असे नाही. तर ज्या वाईट, अनिष्ट, अशुभ किंवा अनैतिक आहेत अशा कृतींचा किंवा आचरणाचा देखील विचार केला जातो. कारण मनुष्य केवळ चांगला किंवा सद्गुणी असतो असे नाही. तसा तो असता तर समाजात कोणतीच नैतिक समस्या निर्माण झाली नसती. वास्तविक मानवी जीवन सदैव सद्गुण-दुर्गुण, नैतिक-अनैतिक, चांगले-वाईट अशा संघर्षांमध्ये गुरफटलेले दिसते. या प्रकरणात दुसऱ्या बाजूचा म्हणजे अनैतिकतेचा विचार करावयाचा आहे.

अनैतिक म्हणजे जे नैतिक नाही ते किंवा जे वाईट, अयोग्य आहे ते असा सरळ साधा अर्थ सांगता येतो. परंतु प्रश्न असा आहे की, अनैतिक किंवा वाईट काय असते ? याला असे उत्तर आहे की, एक तर आचरण किंवा कृती वाईट असते किंवा व्यक्तीचे चारित्र्य अनैतिक असते. जेव्हा एखादी कृती धार्मिकदृष्ट्या वाईट असते तेव्हा तिला पाप (Sin) असे म्हणतात. तर एखादी कृती जेव्हा राजकीयदृष्ट्या वाईट असते तेव्हा तिला गुन्हा (Crime) असे म्हणतात. जेव्हा चारित्र्य वाईट असते तेव्हा त्याला दुर्गुण (Vice) असे म्हणतात.

पाप, गुन्हा आणि दुर्गुण [illegible] तिन्हीत [illegible] दुक असा की या तिन्ही गोष्टींचे [illegible] तसेच [illegible] असतात. तसेच या तिन्हीत एक [illegible] की [illegible] परिणाम परलोकात किंवा इहलोकात भोगावे लागतात. परंतु अनैतिक [illegible] परिणाम इहलोकात किंवा परलोकात भोगावे लागत नाहीत.



या ठिकाणी आपल्याला केवळ 'गुन्हा' या संकल्पनेच्या अनुषंगाने विचार करावयाचा आहे. गुन्ह्याच्या संदर्भात विचार करताना असा प्रश्न निर्माण होतो की गुन्हेगाराला शिक्षा द्यावी का ? द्यावी तर ती का द्यावी ? आणि ती कोणत्या तत्त्वानुसार देण्यात यावी ? हा विचार करत असताना शिक्षा देण्यामागे कोणता नैतिक दृष्टिकोन असावा हा विचार अधिक महत्त्वाचा आहे.

## शिक्षेचे नैतिक समर्थन (Moral Justification of Punishment) :

समाजजीवन जगत असताना काही सद्गुणी जीव स्वतःचा तसेच समाजाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु समाजातील दुर्गुणी जीवांना हा विकास पाहवत नाही. म्हणून असे दुर्गुणी जीव आपला दुष्कृत्यांच्या माध्यमातून सद्गुणी जीवांच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. त्यामुळे सद्गुणी जीवांचा विकास खुंटतो. एवढेच नाही तर समाजाच्या विकासात बाधा निर्माण होते. कधी-कधी दुर्गुणी जीवांच्या संगतीने सद्गुणी जीव देखील दुर्गुणी बनण्याची शक्यता असतो. त्यामुळे सामाजिक अस्वास्थ्य निर्माण होऊ शकते.

दुसरे असे की जीवन जगताना काही राजकीय, सामाजिक नियमांची उपस्थिती अत्यंत आवश्यक असते. कारण प्रत्येकजण स्वतःच्या इच्छेनुसार वागू लागला तर समाज या संकल्पनेचे अस्तित्त्वच राहणार नाही. म्हणून या नियमांचे पालन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. परंतु प्रत्येकजण या कर्तव्याचे पालन करेलच असे म्हणता येत नाही. म्हणून त्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे. नव्हे, त्याला कर्तव्य करण्यास भाग पाडले पाहिजे.

तिसरे [illegible] की गुन्हा केल्याने इतर व्यक्ती किंवा समाजातील [illegible] होते असे नाही [illegible] जीवाचे देखील नैतिक, मानसिक अध:पतन [illegible] खऱ्या [illegible] परखा होतो. अशा व्यक्तींना दुष्कृत्यांपासून [illegible] खऱ्या जीवनाचा प्रकाश दाखवणं देखील गरजेचे असते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे नीतिनियम हे सार्वभौम असतात, व्यक्ती निरपेक्ष असतात. त्यांचे मानवी जीवनात काय महत्त्व आहे, याची जाणीव दुर्गुणी जीवाच्या मनात झाली पाहिजे; म्हणून सद्गुणी जीवांच्या सोबत समाजाची उन्नती घडावी, दुर्गुणी जीवांना आपल्या कर्तव्यांची जाणीव व्हावी, त्यांना दुष्प्रवृत्ती पासून परावृत्त करून खऱ्या मानवतेचे दर्शन घडावे, नीतिनियमांची प्रतिष्ठा कायम राखली जावी यासाठी दुर्गुणी जीवांना शासन (शिक्षा) करणे न्याय्य व समर्थनीय ठरते. यालाच शिक्षेचे नैतिक समर्थन असे म्हणतात.

शिक्षा ही झालीच पाहिजे याबाबत सर्व विचारवंताचे एकमत आहे. परंतु, ही शिक्षा कोणत्या तत्त्वानुसार दिली जावी याबाबत मतभेद आहेत. या मतभेदावरून तीन वेगळे सिद्धांत निर्माण झाले.

## १) शिक्षेचा प्रतिबंधात्मक सिद्धांत (Preventive Theory of Punishment):

या सिद्धांताचा प्रमुख उद्देश गुन्हेगारांना दुःख देणे हा नसून गुन्ह्याच्या प्रवृत्तीला प्रतिबंध बसावा हा आहे. या सिद्धांतानुसार शिक्षा या कारणासाठी दिली जाते की तो गुन्हा आपण जर पुन्हा केला तर त्यासाठी कोणती शिक्षा होईल याची जाणीव गुन्हेगारासोबतच समाजातील सर्व व्यक्तींच्या मनात निर्माण व्हावी. न्यायाधिश एखाद्या गुन्हेगाराने गुन्हा केल्याबद्दल शिक्षा देत नाही. तर तशा प्रकारचा गुन्हा समाजातील दुसऱ्या कुणीही करू नये यासाठी देत असतो. एक न्यायाधिश असे प्रतिपादन करतो की "तू मेंढ्या चोरल्या आहेत म्हणून शिक्षा दिली जात नाही तर मेंढ्या चोरल्या जाऊ नयेत म्हणून शिक्षा दिली जात आहे." हा सिद्धांत यासाठी शिक्षेचे समर्थन करतो की गुन्हा करण्याची इच्छा असलेल्या इतरांच्या मनात शिक्षेमुळे भीती किंवा जरब बसावी. त्यांच्या मनात असलेल्या गुन्ह्याच्या प्रवृत्तीला प्रतिबंध बसावा. प्राचीन काळात व आजही काही राष्ट्रात गुन्हेगारांना जाहीर शिक्षा दिली जाते. उदा. चौकात उभे करून फटके मारणे, जाहीर फाशी देणे किंवा हातकड्या घालून रस्त्यावरून पायी घेऊन जाणे. या मागचा उद्देश असा असतो की गुन्ह्याबद्दल



लोकांच्या मनात भीती निर्माण व्हावी, गुन्ह्याच्या प्रवृत्तीस प्रतिबंध बसावा. हा सिद्धांत देहदंडासारख्या शिक्षेचे देखील समर्थन करतो.

टीकात्मक विवेचन :

१. या सिद्धांताचा हेतू गुन्हेगारी प्रवृत्तीचे समुळ उच्चाटन करणे हा नसून तात्पुरता प्रतिबंध घालणे हा आहे. वास्तविक नैतिकदृष्ट्या मानवी समाजातून गुन्हा किंवा अपप्रवृत्तीचे उच्चाटन झाले पाहिजे.

२. हा सिद्धांत व्यक्तीचा साधन म्हणून वापर करतो. परंतु नैतिकदृष्ट्या प्रत्येक व्यक्ती स्वतःच स्वतःचे साध्य असते. तिचा साधन म्हणून वापर करता येत नाही.

३. या सिद्धांतानुसार शिक्षा दिल्यास गुन्हेगारी प्रवृत्तीचे उच्चाटन तर होत नाहीच, परंतु अशा प्रवृत्तीस प्रतिबंध बसेल असेही म्हणता येत नाही. उलट काही अंशी गुन्ह्यास प्रोत्साहन मिळण्याची शक्यता असते. काही प्रसंगात दिली जाणारी जाहीर शिक्षा पाहण्यासाठी एवढी गर्दी जमू लागली की त्यात एकमेकांचे खिसे कापण्याचे प्रमाण वाढले.

४. या सिद्धांतानुसार खऱ्या गुन्हेगारास शोधून काढण्याचा प्रयत्न होत नाही तर वरवरच्या गुन्हेगारास शिक्षा देऊन गुन्हेगारी प्रवृत्तीस आळा घालण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे कधीकधी निरपराध व्यक्तीस शिक्षा होण्याची शक्यता असते. उलट कायदा असे सांगतो की 'शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील परंतु एका निरपराध व्यक्तीस शिक्षा होता कामा नये.'

## २) शिक्षेचा प्रतिकारात्मक सिद्धांत (Retributive theory of Punishment):

या सिद्धांताचा प्रमुख उद्देश व्यक्तींपेक्षा नीतिनियम सर्वश्रेष्ठ आहेत याची जाणीव करून देणे व गुन्ह्याच्या प्रवृत्तीचा प्रतिकार करणे हा आहे. म्हणून या सिद्धांतास प्रतिकारात्मक सिद्धांत असे म्हणतात. सामाजिक स्वास्थ्य राखणे हे नीतिनियमांचे कार्य असते. म्हणून या नीतिनियमांचा भंग करणाऱ्यांस शिक्षा ही झाली पाहिजे.

या सिद्धांताचा दुसरा उद्देश असा आहे की गुन्हेगाराने केलेल्या कृतीची त्याला जाणीव करून दिली पाहिजे. 'जशास तसे' (Tit for Tat) हे या सिद्धांताचे प्रमुख सूत्र आहे. गुन्हेगाराने जशा प्रकारचा गुन्हा केला आहे तशा प्रकारची शिक्षा त्याला झाली पाहिजे. समर्थ रामदासांच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'घटाशी असावे घट, उद्धटाशी उद्धट.' उदा. एखाद्याने कुणाचा हात तोडला असेल तर त्याचाही हात तोडावा किंवा एखाद्याने खून केला असेल तर त्यालाही देहदंड दिला पाहिजे. म्हणून या सिद्धांतास प्रतिशोधात्मक सिद्धांत असेही म्हणतात. अशा प्रकारची शिक्षा देण्यामागचा हेतू असा की, गुन्हेगार जेव्हा एखादा गुन्हा करतो त्यावेळी त्याचे दुःखद परिणाम इतर निरपराध व्यक्तींना भोगावे लागतात. त्या दुःखद परिणामांची किंवा यातनांची जाणीव गुन्हेगारास झाली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गुन्हा करूनही एखाद्यास शिक्षा झाली नाही तर नीतिनियमांचे अवमूल्यन तर होतेच. त्याबरोबर शिक्षा न मिळाल्याने अप्रत्यक्षपणे गुन्ह्याच्या प्रवृत्तीस प्रोत्साहन मिळते. म्हणून शिक्षा झालीच पाहिजे.

टीकात्मक विवेचन :

१. हा सिद्धांत सूडाच्या भावनेचा पुरस्कार करतो. कारण जशास तसे हे या सिद्धांताचे सूत्र आहे. काही प्रसंगात हे सूत्र योग्य ठरेल ही. परंतु देहदंडासारख्या शिक्षेत मूल्य तत्त्वाचे समर्थन करता येईल का ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. नैतिकदृष्ट्या सूडाच्या भावनेचे समर्थन करता येत नाही. शिक्षेचा हेतू सूड घेणे हा नसावा तर सुधारणा हा असावा.

२. या सिद्धांतानुसार शिक्षा दिल्यास वाईट कृत्याचे उत्तर म्हणून तसेच दुसरे वाईट कृत्य करावे लागते. दुसऱ्या शब्दात शिक्षा देणे म्हणजे एका पापात दुसऱ्या पापाची भर घालण्यासारखेच आहे. नैतिकदृष्ट्या वाईट कृत्याचे समर्थन करता येत नाही..

३) शिक्षेचा सुधारणात्मक सिद्धांत (Reformative theory of Punishment) :

शिक्षेच्या या सिद्धांताचा प्रमुख हेतू गुन्हेगारास शिक्षा देणे हा नसून त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत सुधारणा घडवून आणणे व त्याला नैतिक किंवा आदर्श मानव बनवणे हा आहे. गुन्हेगार मुळात गुन्हेगार नसतो तर त्यामागे निरनिराळी कारणे असतात. या कारणांचा शोध घेऊन ती नष्ट करणे व गुन्हेगारात सुधारणा घडवून आणणे हे या सिद्धांताचे प्रमुख सूत्र आहे.

गुन्हेगार म्हटला की तो वाईटच असा आपला दृष्टिकोन असतो. परंतु प्रत्येक व्यक्ती मुलतः चांगली किंवा सत्प्रवृत्तच असते. परिस्थितीमुळे तो बिघडत असतो. मानसिक किंवा शारीरिक न्यूनता, बेकारी, आर्थिक-सामाजिक-जातीय विषमता अशी अनेक कारणे गुन्हेगारीच्या मुळाशी असतात. जर ही कारणे दूर करून, परिस्थिती सुधारून व्यवस्थित केली तर तो कधीच गुन्हा करणार नाही. यासाठी तुरुंगाचे रूपांतर संस्कार शाळेत किंवा सुधारगृहात झाले पाहिजे. गुन्हेगारात सुधारणा तर झालीच पाहिजे, परंतु त्याच बरोबर त्याच्या अंगी असलेल्या गुणांचा समाजाच्या हितासाठी उपयोग झाला पाहिजे. एवढेच नाही तर जेव्हा तो समाजजीवन जगू लागेल तेव्हा तो आत्मनिर्भरही झाला पाहिजे. म्हणूनच हा सिद्धांत गुन्हेगारास साधन न समजता त्याला एक नैतिक मानव बनवण्याचे ध्येय बाळगतो. आधुनिक काळातील बऱ्याच विचारवंतानी हा सिद्धांत मानवतावादी असल्याचे मान्य केले आहे.

टीकात्मक विवेचन :

१) हा सिद्धांत प्रत्येक गुन्हेगारास वेडा, परिस्थितीने गांजलेला किंवा अज्ञानी समजतो. परंतु प्रत्येक गुन्हेगाराच्या बाबतीत असे समजणे चुकीचे आहे. सर्व परिस्थिती चांगली असतानाही हेतुपुरस्सरपणे गुन्हे करणारे गुन्हेगार असतात. काही गुन्हेगार एवढे बुद्धीमान असतात की संपूर्ण व्यवस्थेला ते फसवू शकतात. अशा गुन्हेगारांसंदर्भात काय करावचे ? हा विचार या सिद्धांतात नाही.

३) काही विचारवंतांच्या मते शिक्षा देणे याचा अर्थ गुन्हेगारास काही प्रमाणात का होईना दंड देणे, दुःख देणे. परंतु हा सिद्धांत गुन्हेगारास शिक्षा देण्याची भाषा तर करत नाहीच. उलट सुधारणा घडवण्याची भाषा करतो. म्हणून ज्यात शिक्षेचे प्रतिपादन नाही त्यास शिक्षेचा सिद्धांत कसे म्हणायचे ?

वरील तिन्ही सिद्धांत पाहिल्यास असा प्रश्न स्वाभाविक आहे की कोणता सिद्धांत स्वीकार्य आहे ? अर्थात हे ठीक आहे की आपली दृष्टी जशी असेल त्यानुसार त्या सिद्धांताची स्वीकार्यता ठरू शकते. तरीपण 'न्याय' संकल्पनेचा विचार केल्यास प्रतिबंधात्मक सिद्धांत स्वीकार्य ठरतो. कारण गुन्हा करून गुन्हेगार इतरांवर जो अन्याय करतो त्याचे काही प्रमाणात का होईना परिमार्जन होऊ शकते, काही प्रमाणात का होईना न्याय मिळू शकतो. परंतु मानवतावादी दृष्टिकोनातून सुधारणात्मक सिद्धांत स्वीकार्य ठरतो. कारण हा सिद्धांत गुन्हेगारास साधन न समजता साध्य समजत असतो. मानव हा मुळात सत्प्रवृत्त असतो या विचारांशी तो सुसंगत आहे. कारागृहे ही सुधारगृहे बनली पाहिजेत असे तो मानतो. देहदंडासारख्या रानटी व क्रूर शिक्षेला विरोध करत असला तरी देशद्रोहासारख्या गुन्ह्याच्या बाबतीत त्याचे समर्थनही करतो. जगातील अनेक मानवतावादी विचारवंताना तो मान्य आहे. म्हणून इतर सिद्धांताच्या तुलनेत हा सिद्धांत स्वीकार्य आहे.

## देहदंड : योग्य की अयोग्य ? (Capital Punishment : Right or wrong):

गुन्ह्याच्या संदर्भात देहदंडाची शिक्षा ही अंतिम शिक्षा असते असे म्हटले तर ते फारसे वावगे ठरणार नाही. एकीकडे प्रतिशोधात्मक सिद्धांत देहदंडाचे जोरदार समर्थन करतो. तर दुसरीकडे काही अपवाद सोडले तर सुधारणात्मक सिद्धांत देहदंडास क्रूर व रानटी शिक्षा समजतो. मग प्रश्न असा आहे की देहदंड योग्य आहे की अयोग्य आहे ? याला दोन पद्धतीने उत्तर देता येते.

१) देहदंड हा सामान्यतः देशद्रोह किंवा खुनासारख्या गुन्ह्यांसाठी दिला जातो. परंतु असा देहदंड दिल्याने त्या गुन्ह्याची भरपाई होऊ शकते का ? अर्थातच नाही. देहदंडाची प्रथा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. असे असूनही गंभीर स्वरूपाचे गुन्हे करण्याची प्रवृत्ती समाजात आजही पहावयास मिळते. कधी-कधी गुन्हेगार म्हणून एखाद्या व्यक्तीस देहदंड दिला आणि नंतर त्या व्यक्तीचे निरपराधित्व सिद्ध झाले, तर झालेल्या चुकीची दुरुस्ती करता येऊ शकत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गुन्हा हा सहसा हेतुपुरस्सरपणे केला जात नाही, तर त्याला बहुतांश वेळा परिस्थिती कारणीभूत ठरत असते. अशावेळी केवळ व्यक्तीलाच दोषी ठरवणे न्याय्य ठरत नाही. म्हणून सारासार विचार करता देहदंडासारखी भयानक शिक्षा देणे योग्य नाही.

२) वर पाहिल्याप्रमाणे देहदंड विशिष्ट परिस्थितीतच दिला जातो. एखाद्याचा खून करणे म्हणजे एखाद्याचा निसर्गदत्त असा जगण्याचा हक्क हिरावून घेणे होय. असा हक्क हिरावून घेणे नैतिकदृष्ट्या अयोग्य आहे. म्हणून खुन्याला देहदंड देणे गरजेचे आहे. आपण आपला जगण्याचा हक्क सोडल्याशिवाय दुसऱ्याच्या जगण्याचा हक्क हिरावून घेता येत नाही, हा संदेश त्याशिवाय समाजात संप्रेषित होणार नाही. एखादी व्यक्ती जेव्हा गंभीर स्वरूपाचा देशद्रोह करते तेव्हा ती समाजाचे आणि पर्यायाने समाजात राहणाऱ्या व्यक्तींचे जीवन धोक्यात आणत असते. तेव्हा अशा देशद्रोही व्यक्ती जिवंत न राहिलेल्याच बऱ्या. इतर कोणत्याही प्रकारच्या शिक्षेचा फारसा परिणाम व्यक्तीवर होत नाही. तुलनेने देहदंडाचे परिणाम अधिक भयानक व बराच काळ टिकणारे असतात. बऱ्याच विचारवंताच्या मते देहदंडापेक्षा जन्मठेपेची शिक्षा देणे उचित आहे. परंतु हा विचारही तेवढा संयुक्त वाटत नाही. कारण जन्मठेपेत गुन्हेगारास दीर्घकाल यातना सहन कराव्या लागतात. देहदंडात सर्व प्रकारच्या यातनेतून मुक्तता होते. जन्मठेपेत विशिष्ट यंत्रणा निर्माण करून सतत खर्च करावा लागतो. देहदंडात हे सर्व टळते. जन्मठेप भोगून आलेला गुन्हेगार हा नंतर चांगला नागरिक बनेल याची शाश्वती नाही. शिवाय अशा गुन्हेगारांच्या उपस्थितीत समाज स्वतःला असुरक्षित समजतो. अशा अनेक कारणांमुळे देहदंड देणे योग्य आहे.

देहदंडाबाबतची वरील दोन्ही मते सारख्याच रीतीने योग्य वाटतात. नैतिक दृष्ट्या कोणत्या मताचे समर्थन करता येते ? तर याला असे उत्तर आहे की काही

विशिष्ट परिस्थितीत देहदंड दिलाच पाहिजे. जेव्हा मानवी जीवनाचे पावित्र्य, अस्तित्त्व धोक्यात येते तेव्हा कसलीही तडजोड उचित ठरत नाही. सूडभावनेने केला जाणारा खून आणि त्यासाठी समाजहित लक्षात घेऊन सूडरहित भावनेने दिलेला देहदंड या दोहोतील मुलभूत फरक न करता आल्यानेच देहदंडावर टीका केली जाते. खून करण्यामागे अतिरेकी स्वार्थी प्रवृत्ती असते तर देहदंडात मानवी जीवनाचे पावित्र्य राखणे हा हेतू असतो. म्हणूनच नैतिकदृष्ट्या देहदंड देणे योग्य ठरते.

## शिक्षा आणि क्षमा (Punishment and Forgiveness) :

गुन्हेगाराच्या मनातील गुन्हेगारी प्रवृत्ती नाहीशी करून त्यात सुधारणा घडवून आणणे हा शिक्षेचा मूळ उद्देश आहे. नैतिक नियमांची प्रतिष्ठा कायम राखणे हा महत्त्वाचा हेतूदेखील त्यात अभिप्रेत आहे. म्हणजेच नीतिनियमांचे सार्वभौमत्व कायम राखून, गुन्हेगाराचे हृदय परिवर्तन घडवून आणणे व त्याच्या ठिकाणी नैतिक जीवनाची जाणीव निर्माण करणे हा शिक्षेचा उद्देश आहे. परंतु हा बदल शिक्षा न देता क्षमेच्या माध्यमातूनही घडवून आणता येऊ शकतो. योग्य शिक्षण आणि मन परिवर्तनाच्या सहाय्याने गुन्हेगाराच्या प्रवृत्तीत सुधारणा घडवून आणता येते. विशेषत: तरूण गुन्हेगारांच्या संदर्भात शिक्षा किंवा सक्तीपेक्षा प्रेमाने सुधारणा घडवून आणता येऊ शकते. म्हणून जे शिक्षेने साध्य करावयाचे ते क्षमा करूनही साध्य करता येऊ शकते.

योग्य रीतीने मनपरिवर्तन करून शिक्षण दिले आणि गुन्हेगारात बदल किंवा पश्चाताप घडवून आणता आला तर ते अधिक समर्थनीय ठरते. त्यासाठी शिक्षेपेक्षा क्षमा करणे हेच नैतिकदृष्ट्या उचित ठरते. शिक्षा कधी-कधी गुन्हेगारास अधिक कठोर गुन्हेगार बनवू शकते. परंतु क्षमा त्याच्या व्यक्तीमत्त्वात अमुलाग्र बदल घडवून त्याला एक नैतिक व्यक्ती बनवू शकते. म्हणून विशेषत: किमान पहिल्या गुन्ह्याच्या संदर्भात तरी शिक्षेपेक्षा क्षमा अधिक प्रभावी ठरू शकते.